तर्खडकर भाषांतरपाठमाला

भाग - १

लेखक

द्वारकानाथ राघोबा तर्खडकर

प्रस्तावना

ह्या पुस्तकाचें नांव भाषांतरपाठमाला असें ठेविलें आहे, ह्याचें कारण हेंच कीं, ह्याचा मुख्य उद्देश मराठीचें इंग्रजी व इंग्रजीचें मराठी भाषांतर शिकविण्याचा आहे. परंतु व्याकरणाची कांहीं माहिती असल्याशिवाय भाषांतर करितां येणें अशक्य, म्हणून प्रत्येक धड्याच्या आरंभीं व्याकरणाचे एक दोन नियम, त्यांचीं उदाहरणें, भाषांतर करण्याचे मासले, वीसपंचवीस शब्दांचा संग्रह व शेवटीं भाषांतर करण्याकरितां सुमारे पंचवीस मराठी व पंचवीस इंग्रजी, अशीं अदमासें पन्नास वाक्यें दिलीं आहेत. असे धडे शेचाळीस आहेत. धड्यांचा क्रम असा ठेविला आहे कीं, अगदीं लहान व सोप्या वाक्यांपासून उत्तरोत्तर अवघड वाक्यांचें भाषांतर करितां यावें. ह्या पहिल्या पुस्तकांत, साधारण व सोप्या अशा प्रचारांतल्या वाक्यांचें भाषांतर करितां यावें, इतकाच विस्तार केला आहे. ह्यांत व्याकरणापैकीं नामांचीं वचनें व विभक्ति, पुरुषवाचक, दर्शक व प्रश्नार्थक सर्वनामें, उपपदें, विशेषणें, क्रियाविशेषणें विशेषणांचा व क्रियाविशेषणांचा तारतम्यभाव, क्रियापदांचे स्वार्थी वर्तमान, रीतिवर्तमान, अपूर्णवर्तमान, पूर्णवर्तमान, भविष्य व भूतकाळ व आज्ञार्थी वर्तमानकाळ, To be व To have हीं अनियमित क्रियापदें, निषेधार्थी व प्रश्नरूपी वाक्यें, शब्दयोगी अव्ययें, प्रयोग आणि *it*, *there*, व स्वतां, ह्यांचें भाषांतर, एवढ्या विषयांचा थोडाबहुत समावेश केला आहे. शब्दांच्या यादींत नेहमीं प्रचारांत येणारे जे शब्द तेच घातले आहेत. असे सगळ्या पुस्तकांत एकंदर सुमारें हजार-बाराशें शब्द असतील. प्रत्येक शब्दाचा उच्चार व पदावरचा जोर हे अंकांच्या व चिन्हांच्या योगानें स्पष्ट केले आहेत. शब्दांचे मुख्य व प्रचारांतले मात्र अर्थ दिले आहेत. सारख्या अर्थाच्या शब्दांमधील वास्तविक भेद मुख्यत्वेंकरून खालीं टीपांतून दाखविले आहेत; ह्यासंबंधानें टीपा विद्यार्थ्यांस फार उपयोगी पडतील अशी आशा आहे. शब्दांच्या अर्थाविषयीं जेवढी काळजी घ्यावी तेवढी थोडीच; कारण बोलण्यांत व भाषांतर करण्यांत मुलांच्या चुका पुष्कळ अंशीं शब्दांचे खरे अर्थ ठाऊक नसल्यामुळें होतात. कोशांतील इंग्रजी शब्दांविषयीं दुसरी एक गोष्ट विसरतां कामा नये ती ही कीं, प्रत्येक नामाच्या पूर्वीं उपपद घातलें आहे. सामान्य नामाच्या पूर्वीं उपपद घालणें इंग्रजींत अवश्य आहे. म्हणून बोलण्यांत व लिहिण्यांत तीं नामें उपपद घातल्यावांचून कदापि उच्चारूं नयेत. ज्यांच्या पूर्वीं *a* किंवा *an* हें उपपद घातलें आहे, त्यांच्या पूर्वीं (अमुकच व्यक्ति विवक्षित असतां) *a* किंवा *an* बद्दल *the* येऊं शकतें. ज्यांच्या पूर्वीं *the* घातलें आहे. त्यांच्या पूर्वीं बहुतकरून *a* किंवा *an* येऊं शकत नाहीं, व ज्यांच्या पूर्वीं उपपद घातलें नाहीं, त्यांना बहुधा त्याची अपेक्षा मुळींच नसते.

प्रस्तावना

वाक्यें कांहीं अंशीं प्रचारांतलीं व कांहीं अंशीं दुसऱ्या पुस्तकांतले उतारे आहेत. ह्या पुस्तकांत इंग्रजी भाषेंतील चमत्कारिक रूढ प्रकार फारच थोडे आणिले आहेत. ग्रंथकर्त्यांचें मत असें आहे कीं, प्रथम विद्यार्थ्यांस व्याकरणदृष्ट्या शुद्ध बोलतां व लिहितां आलें म्हणजे पुष्कळ—मग जरी तें त्या भाषेच्या मोडणीप्रमाणें नसलें तरी हरकत नाहीं. भाषणाच्या चमत्कारिक प्रकारांचें ज्ञान, ही पुढली पायरी आहे. म्हणून त्याच्याकडे अधिक लक्ष दुसऱ्या पुस्तकांत दिलें जाईल. पुस्तकाच्या आरंभीं 'वाचनविचार' म्हणून जो भाग जोडला आहे, त्यांत इंग्रजीच्या उच्चारांविषयीं नियम दिले आहेत. ह्या भागांतील बहुतेक कोष्टकें हॉवर्ड साहेबांच्या दुसऱ्या पुस्तकांतून घेतलीं आहेत. पुस्तकाच्या शेवटीं पुरवणी जोडिली आहे, तिचे तीन भाग केले आहेत. पहिल्या भागांत इंग्रजी व्याकरणांतील शब्दविचारांचें संक्षिप्त वर्णन दिलें आहे. हा भाग करण्याचा हेतु असा आहे कीं, पुस्तकांत व्याकरणाचा एकंदर जो भाग शिकवण्यांत आला, तो एकदम व्याकरणाच्या दृष्टीनें विद्यार्थ्यांच्या लक्षांत यावा—तसेंच त्याची उजळणी करितां यावी व नामें, सर्वनामें व क्रियापदें पद्धतवार चालवितां यावी. पुस्तकांत न आलेली अशी थोडीशी उपयुक्त माहितीही त्यांत आढळेल. दुसऱ्या भागांत आलेले कांहीं भाषणाचे प्रकार एकत्र आणून स्पष्ट केले आहेत. तिसऱ्या भागांत सगळ्या पुस्तकावर सुमारें १५० प्रश्न दिले आहेत. परंतु ह्यांची संख्या शिक्षकांस पाहिजे तेवढी वाढवितां येईल. Arnold's "Henry's First Latin Book" नामक इंग्रजींत लिहिलेलें लॅटिन भाषेचें पहिलें पुस्तक व प्लाटे साहेबांनीं जर्मन भाषेंत केलेलें इंग्रजीचें पहिलें पुस्तक ह्या दोन्ही पुस्तकांच्या पद्धतीप्रमाणें हें पुस्तक रचिलें आहे. परंतु हें पुस्तक करण्याची कल्पना मूळची ग्रंथकर्त्याची नसून मेहरबान एच्. पी. जेकब साहेब मुंबईतील एल्फिन्स्टन् हायस्कूल नामक सरकारी शाळेचे अध्यक्ष ह्यांची आहे व हें सर्व पुस्तक तपासण्यांत व विशेषेंकरून इंग्रजीचे उच्चार व इंग्रजी वाक्यांत शुद्धाशुद्ध पाहणें, ह्यांत, त्यांनीं अनेक प्रसंगीं आपली अमोलिक वेळ पुष्कळ खर्चेली व परिश्रमही पुष्कळ केले, म्हणून ग्रंथकर्ता त्यांचा फार आभारी आहे.

हें पुस्तक लिहून तयार झाल्यानंतर मुंबई इलाख्यांतील शाळाखात्याच्या अधिकाऱ्यांनीं मेहरबान क्यांडी साहेब ह्यांस दाखविलें. त्यांनीं आपली संमति प्रदर्शित करतांना कित्येक उपयुक्त सूचना कळविल्या. त्यांबद्दल ग्रंथकर्ता फार आभारी आहे.

द्वा. रा. तर्खडकर.

ज्या ग्रंथांच्या आधारावरून भाषांतरपाठमालेचे सर्व भाग रचिले त्यांचीं नांवें.

1. Candy's English and Marathi Dictionary.
2. Molesworth's Marathi and English Dictionary.
3. Webster's English Dictionary.
4. Plate, Lehrgander English Sprache, Part I & II.
5. Maetzner's English Grammar in 3 Vols.
6. Hiley's English Grammar.
7. Howard's English Series, Book II, Part I.
8. ,, English Grammar.
9. Arnold's English Grammar.
10. Adam's English Grammar.
11. Mason's English Grammar.
12. दादोबाकृत महाराष्ट्र व्याकरण.

दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

भाषांतरपाठमालेचा पहिला भाग बरेच दिवस सरकारी शाळांतून चालत असल्यावरून मेहरबान डायरेक्टर साहेब ह्यांनीं हें पुस्तक इंग्रजी भाषा शिकविण्याच्या उपयोगीं कितपत पडतें ह्याविषयीं कित्येक हायस्कुलांच्या अँग्लोव्हर्नाक्युलर शाळांच्या हेडमास्तरांचीं मतें घेतलीं, तीं एकंदरींत अनुकूल पडून त्यांनीं ज्या ज्या उपयुक्त सूचना केल्या, त्यांच्या आधारानें व त्याचप्रमाणें स्वत:ला जे फेरफार करावेसे वाटले त्यांची यथायोग्य योजना करून. ही दुसरी आवृत्ति रचण्यांत आली आहे. त्यांत बहुतेकांच्या विचारास असें आलें कीं, ह्या पुस्तकाचेच दोन भाग करून ते पहिल्या दोन इयत्तांकरितां निरनिराळे छापले असतां किंमत कमी पडून मुलांस विकत घेणें सोईवार पडेल. त्याप्रमाणें ह्या पहिल्या पुस्तकाचे आतां दोन भाग वेगवेगळे छापिले आहेत व त्यांस यथानुक्रमें 'पुस्तक १ *भाग १' व 'पुस्तक १ भाग २,' अशीं नांवें दिलीं आहेत. त्याचप्रमाणें वाचनविचारांतील कांहीं धडे काढून टाकावे असें कित्येकांचें मत पडल्यावरून तसें केलें आहे. कित्येक धडे फार मोठे झाले होते, त्यांतील इंग्रजी वाक्यें कमी करून ते लहान केले आहेत. ह्यांखेरीज लहानसहान पुष्कळ फेरफार केले आहेत, ते हीं पुस्तकें पहिल्या आवृत्तीशीं ताडून पाहिलीं असतां सहज लक्षांत येतील. ग्रंथकर्त्यांच्या विनंतीकरून वऱ्हाडांतील शाळाखात्याचे डायरेक्टर रावबहादूर नारायण भाई दांडेकर ह्यांनीं तेथील एकदोन विद्वान् गृहस्थांचीं मतें पाठविलीं, तसेंच रावबहादूर दादोबा पांडुरंग, रावसाहेब आबाजी विष्णु काथवटे, वगैरे कित्येक विद्वान् गृहस्थांनीं महत्त्वाच्या सूचना केल्या त्यांबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार आभारी आहे. प्रथमावृत्तीप्रमाणेंच ह्या आवृत्तीच्या प्रसंगींही मेहरबान एस्. पी. जेकब साहेब ह्यांनीं फार तसदी घेतली ह्याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचाही फार आभारी आहे.

---

* आठव्या आवृत्तीच्या वेळीं 'पुस्तक १ भाग १' व 'पुस्तक १ भाग २' हीं नांवें बदलून 'भाग १' व 'भाग २' अशीं यथाक्रमें नांवें दिलीं आहेत. ह्या आवृत्तीच्या वेळीं रा. रा. लिंबाजी सदाशिव पानसी, व्हिलेज-रजिस्ट्रार, डोणजें, तालुका हवेली, जिल्हा पुणें, ह्यांनीं फार चांगल्या सूचना केल्या त्यांबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार आभारी आहे. अशा प्रकारें पुस्तक शिकविण्याचा अनुभव घेतलेले शिक्षक होईल तितकी मदत करतील तर त्यांचे ग्रंथकर्त्यांवर मोठे उपकार होतील.

शिक्षकांस सूचना.

वाचनविचार शिकवितांना मुलांकडून पाठ करून फारसें न घेतां त्यांच्याकडून तो भाग पुनः पुनः वाचवावा व त्यावर प्रश्न नेहमीं करीत असावे म्हणजे मुख्य मुख्य गोष्टी त्यांच्या सहजच लक्षांत राहतील. विशेषेंकरून शब्द वाचवून घेण्याकडे फार लक्ष द्यावें. एरवीं नियमांचें फारसें महत्त्व नाहीं. **भाषांतरपाठमाला** शिकवितांना प्रथम शिक्षकानें नियम, उदाहरणें व शब्द वाचवून घ्यावे. नियमांचा अर्थ मुलांस समजतो किंवा नाहीं हें विचारून पाहावें व समजत नसला तर सांगावा, शब्द वाचवून घेतांना उपपदें, उच्चार, पदांवरील जोर व वर्णरचना, ह्यांकडे मुलांचें लक्ष लावावें. तसेंच, प्रत्येक शब्द व्याकरणदृष्ट्या कोणत्या जातीचा आहे हें सांगावें. दुसऱ्या दिवशीं ह्यांविषयीं मुलांस प्रथम प्रश्न करावे, व त्यांनीं धडा तयार केला असला तर भाषांतरपाठाचें भाषांतर त्यांच्याकडून तोंडीं करवून घ्यावें. नंतर दुसरा धडा सांगावा. भाषांतरपाठाचें तोंडीं भाषांतर केलें असेल तें मुलांना घरून वहींत लिहून आणावयास सांगावें व तें शिक्षकानें शुद्ध करून चुका मुलांस वर्गांत सांगाव्या. मागील शब्द कधीं कधीं विचारीत असावे व पुरवणींतील प्रश्न करावे. परीक्षेच्या दिवशीं नवीन प्रश्न काढून द्यावे व वाक्यें पुस्तकांतलीं देऊं नयेत—त्याच शब्दांवरून नवीन वाक्यें रचावीं. व्याकरणाकडे पहिल्यापासून लक्ष देत असावें व शब्दांची वर्णरचना नेहमीं विचारीत जावें.

अनुक्रमणिका.

वाचनविचार.

भाषांतरपाठमाला.

धडा १.

मूळाक्षरें.

१. इंग्रजी भाषेंत सव्वीस मूळाक्षरें आहेत. तीं पुढील कोष्टकांत दिलीं आहेत.

कोष्टक १.

अक्षराचें नांव	रोमन लिपि मोठी	रोमन लिपि लहान	इटालिक लिपि मोठी	इटालिक लिपि लहान	उच्चार.
ए	A	a	*A*	*a*	—†
बी	B	b	*B*	*b*	ब्
सी	C	c	*C*	*c*	क्, स्
डी	D	d	*D*	*d*	ड् ‡
ई	E	e	*E*	*e*	एचा उच्चार लवकर केला
एफ्	F	f	*F*	*f*	—{असतां जो होतो तो.
जी	G	g	*G*	*g*	ग्, ज्
एच्*	H	h	*H*	*h*	ह्
आय्	I	i	*I*	*i*	इ, आइ
जे	J	j	*J*	*j*	ज्
के	K	k	*K*	*k*	क्
एल्*	L	l	*L*	*l*	ल्
एम्*	M	m	*M*	*m*	म्
एन्*	N	n	*N*	*n*	न्
ओ	O	o	*O*	*o*	—
पी	P	p	*P*	*p*	प्
क्यू	Q	q	*Q*	*q*	क्
आर्	R	r	*R*	*r*	र् ‡
एस्*	S	s	*S*	*s*	स्, ज्
टी	T	t	*T*	*t*	ट्
यू	U	u	*U*	*u*	उ, अ
—	V	v	*V*	*v*	—
डब्ल्यू	W	w	*W*	*w*	उ किंवा व्
एक्स्*	X	x	*X*	*x*	क्स्
वाय्	Y	y	*Y*	*y*	इ किंवा य्
झेड्*	Z	z	*Z*	*z*	झ्

* ह्यांतील एचा उच्चार लवकर करावा, लांब ओढूं नये.

† अक्षराच्या नांवाच्या किंवा उच्चाराच्या जागीं जेथें रेघ काढली आहे तीं नांवें व ते उच्चार शिक्षकापासून शिकावे.

‡ पृ० ४ कलम ९ पहा.

२. कांहीं अक्षरांच्या नांवांवरून त्यांचे **उच्चार** एकाएकीं लक्षांत येत नाहींत; जसें:-*H* ह्याचा उच्चार **ह्**, *U* ह्याचा **अ.**

३. छापील लेख **रोमन** लिपींत लिहिलेले असतात. हातानें लिहितांना **इटालिक** लिपीचा उपयोग करावा. एखाद्या अक्षराकडे, शब्दाकडे किंवा वाक्याकडे वाचणाऱ्याचें विशेष लक्ष लागावें, ह्या उद्देशानें **इटालिक** लिपीचा छापील लेखांतही कोठें कोठें उपयोग करितात.

४. वाक्यांच्या व विशेषनामांच्या आरंभीं **मोठीं** अक्षरें, व इतर सर्व ठिकाणीं **लहान** अक्षरें लिहावीं. I (मी) हें एकाक्षरी सर्वनाम नेहमीं मोठ्या अक्षरानें लिहावें.

५. इंग्रजींत *a, e, i, o, u* असे पांच स्वर आहेत.

६. *W* चा उच्चार कांहीं अंशीं उ सारखा व कांहीं अंशीं व् सारखा, आणि *y* चा उच्चार कांहीं अंशीं इ सारखा व कांहीं अंशीं य् सारखा होतो. तसेंच दुसऱ्या स्वरांशीं संयोग असतां *w* व *y* ह्यांचे अनेक स्वरोच्चार होतात. कधीं कधीं तर *w* चा उच्चार मुळींच होत नाहीं. तेव्हां, ह्या वर्णांस स्वर म्हणावें किंवा व्यंजनें म्हणावीं, ह्याचा निर्णय करणें फार कठीण आहे. परंतु साधारण नियम असा आहे कीं, शब्दाच्या किंवा शब्दाच्या अवयवाच्या आरंभीं हे वर्ण असले तर, त्यांच्या उच्चाराकडे विशेष लक्ष न देतां, त्यांस व्यंजनांत गणावें व इतर सर्व स्थळीं ते स्वर आहेत, असें समजावें.

७. बाकीचीं एकोणीस अक्षरें व्यंजनें समजावीं.

८. व्यंजनांपैकीं *c* आणि *q* हे दोन वर्ण निरुपयोगी आहेत; कारण, *c* चें कार्य *s* आणि *x*, आणि *q* चें कार्य *k* हें

अक्षर करितें. शिवाय *x* हें जोडाक्षर आहे. तेव्हां, हीं तीन अक्षरें गाळलीं तर, इंग्रजींत पांच स्वर व (*w* व *y* धरून) अठरा व्यंजनें आहेत, असें म्हटलें पाहिजे. आतां मराठींत पाहिलें तर, सोळा स्वर व चौतीस व्यंजनें आहेत. ह्यावरून असें दिसतें कीं, वर्णांच्या केवळ संख्येकडे जर लक्ष दिलें तर, मराठी भाषा इंग्रजी भाषेपेक्षां अधिक प्रौढ आहे. परंतु इंग्रजींत कांहीं वर्णांचे अनेक उच्चार होतात, त्यामुळें वर्णांचा संयोग केला असतां, मराठींत जे अधिक वर्ण आहेत त्यांचे उच्चार बहुधा सर्व करितां येतात. म्हणून इंग्रजींत वर्ण जरी कमी आहेत, तथापि त्यांपासून मराठींतील बहुतेक सर्व वर्णांचें कार्य होतें. असें आहे तथापि, कांहीं वर्णांचे उच्चार मराठींत आहेत, ते शुद्ध इंग्रजी शब्दांत मुळींच सांपडत नाहींत; जसें :—ऋ, ॠ, ऌ, ॡ, ऐ,* औ, छ, ष, ळ इत्यादि.† तसेंच इंग्रजींत कांहीं वर्णांचें उच्चार असे आहेत कीं, ते मराठींत मुळींच आढळत नाहींत. ते खालीं दिले आहेत.‡—

स्वर—१. Hat वगैरे शब्दांत *a* चा उच्चार होतो तो.

२. All वगैरे शब्दांत *a* चा उच्चार होतो तो.

३, Not वगैरे शब्दांत *o* चा उच्चार होतो तो.

---

* ऐ, औ, ह्यांबद्दल इंग्रजींत आइ, आउ, असे उच्चार सांपडतात.

† हीं अक्षरें चिन्हादिक साधनां[illegible] योगानें दाखवितां येतात हें खरें आहे; तथापि त्यांचे उच्चार शुद्ध इंग्र[illegible] शब्दांत सांपडत नाहींत, म्हणून तीं येथें दिलीं आहेत.

‡ हे नवीन उच्चार शिक्षकापासून नीट लक्ष देऊन शिकावे. विशेषेंकरून स्वरांपैकीं दुसरा व तिसरा ह्या उच्चारांकडे फार लक्ष द्यावें. कारण, ते सारखे दिसतात, तथापि भिन्न आहेत—तिसरा उच्चार ऱ्हस्व, व दुसरा दीर्घ आहे, असें म्हटलें तरी चालेल.

व्यंजनें—१ *F.**

२ *V.*†

९. कांहीं उच्चार इंग्रजींत केवळ नवीन आहेत असें नाहीं; तथापि ते मराठीपासून किंचित् भिन्न आहेत.

(१). *D* चा उच्चार ड् च्या उच्चारापेक्षां कांहींसा मृदु असतो. ड् चा उच्चार करतांना जीभ टाळ्यावर जेवढ्या जोरानें दाबावी लागते, तेवढा जोर *d* चा उच्चार करतांना द्यावा लागत नाहीं. त्यांतही आणखी दोन सूक्ष्म भेद आहेत. ते असे कीं, *d* च्या पुढें स्वरोच्चार असला तर अंमळ स्पष्ट उच्चार होतो, आणि व्यंजनोच्चार असला तर किंवा पदांतीं कांहीं अंशीं उच्चार अस्पष्ट होतो.

(२). *R* चा उच्चार मराठी र् च्या उच्चारापेक्षां मृदु असून त्यांतही वरीलप्रमाणेंच दोन सूक्ष्म भेद आहेत. म्हणजे *r* ह्याच्या पुढें स्वरोच्चार असला तर अंमळ स्पष्ट उच्चार होतो, आणि व्यंजनोच्चार असला तर किंवा पदांतीं कांहीं अंशीं अस्पष्ट उच्चार होतो.

(३). *T* चा उच्चार मराठी ट् च्या उच्चारापेक्षां मृदु असून त्यांतही वर सांगितल्याप्रमाणें दोन सूक्ष्म भेद आहेत.

(४). *Th* चा कधीं कधीं थ् सारखा उच्चार होत असतो. परंतु थ् चा उच्चार करतांना जितक्या जोरानें जीभ वरील दांतांच्या मुळाशीं आपटावी लागते, तितका जोर न दिला, म्हणजे *th* चा उच्चार होतो.

---

* *ph* ह्याचा उच्चार *f* सारखाच होतो.

† *V* चा उच्चार व्ह् नव्हे.

Th चा कधीं कधीं द् सारखा उच्चार होत असतो, त्याचाही असाच प्रकार आहे.

(५). *W* चा उच्चार व् पासून कांहींसा निराळा आहे. **व्** चा उच्चार करतांना वरील दांतांचा खालच्या ओंठाच्या मुळाशीं स्पर्श होतो. परंतु *w* चा उच्चार कर्तव्य असतां केवळ तसें करण्याची गरज नाहीं. **अउ** हे स्वर संधि न करतां जलद उच्चारले असतां जो उच्चार होतो तसाच *w* चा होतो.

धडा २.

मुख्य स्वरोच्चार.

१०. **स्वरोच्चार** म्हणजे स्वरांसारखे उच्चार. ते दोन प्रकारचे आहेत—**मुख्य** आणि **संयुक्त.**

११. इंग्रजींत मुख्य स्वरोच्चार बारा आहेत—**अ, आ,** hat शब्दांतील *a* चा उच्चार, not शब्दांतील *o* चा उच्चार all शब्दांतील *a* चा उच्चार, **इ, ई, उ, ऊ,** met शब्दांतील **ऱ्हस्व ए,** hate शब्दांतील दीर्घ **ए,** आणि **ओ.**

१२. हॉवर्ड साहेबांच्या रीतीप्रमाणें हे उच्चार खालीं दिलेल्या क्रमानें लक्षांत ठेवावे.

कोष्टक २.

नंबर १,	hat	सारख्या	शब्दांतील	*a*	चा उच्चार—
२,	hate	,,	,,	*a*	,, दीर्घ ए.
३,	far	,,	,,	*a*	,, आ.

नंबर ४, all सारख्या शब्दांतील *a* चा उच्चार—

५,	met	,,	,,	*e*	,,	ऱ्हस्व ए
६,	me	,,	,,	*e*	,,	ई.
७,	her	,,	,,	*e*	,,	अ.
८,	bit	,,	,,	*i*	,,	इ.
९,	not	,,	,,	*o*	,,	
१०,	note	,,	,,	*o*	,,	ओ.
११,	do	,,	,,	*o*	,,	ऊ.
१२,	bull	,,	,,	*u*	,,	उ.

१३. ह्यांपैकीं प्रत्येक स्वरोच्चार अनेक स्वरांपासून उत्पन्न होतो. *A* पांसून पहिला स्वरोच्चार होतो.

१४. **वाचनपाठ १.**—*A* ह्याचा नंबर १ प्रमाणें उच्चार करून खालीं दिलेले शब्द वाचावे.*

b*a*d	f*a*n	r*a*t
b*a*g	n*a*p	r*a*p
m*a*n	r*a*g	t*a*p
m*a*p	r*a*m	h*a*d
m*a*t	f*a*t	m*a*t
b*a*d	h*a*m	*A*lps

१५. *Ai* व *ay* ह्यांपासून दुसरा उच्चार होतो. तसेंच शब्दाच्या शेवटीं *e* हा वर्ण असून त्याच्या पूर्वी व्यंजन असलें तर त्या व्यंजनाच्या पूर्वींच्या *a* चा उच्चार असाच होतो.

---

* पुढें हें पुस्तक वाचतांना, इंग्रजी शब्दांच्या स्वरांच्या माथ्यावर बारीक आंकडे दिलेले दिसतील, ते वरील कोष्टकांतील नंबर समजावे.

१६. **वाचनपाठ २.**

aid	*day**	bake†
bait	*bay*	*cake*
pain	*may*	*cane*
rain	*pay*	*date*
vain	*ray*	*fate*

१७. तिसरा उच्चार *a* चा होतो.

१८. **वाचनपाठ ३.**

bar	**far**	**mark**
bark	**farm**	**tar**
car	**hard**	**barn**
card	**lark**	**star**
dark	**mar**	**start**

१९. चौथा उच्चार *aw* चा व कधीं कधीं *a* व *o* ह्यांचा होतो.

२०. **वाचनपाठ ४.**

law‡	bald	coan
paw	ball§	for
raw	call	horn
dawn	fall	lord
bawl	hall	form

२१. पांचवा उच्चार बहुधा *o* चा होतो.

---

* अशा ठिकाणीं *y* हें अक्षर स्वरांत गणावें. पृ० २ कलम ६ पहा.

† बहुधा शब्दाच्या शेवटल्या *e* चा उच्चार होत नाहीं.

‡ अशा ठिकाणीं w हें अक्षर स्वरांत गणावें. पृ० २ कलम ६ पहा.

§ *Ll* चा *l* सारखाच उच्चार करावा. ह्याप्रमाणें कोणत्याही व्यंजनाच्या द्वित्वाचा मूळ व्यंजनाप्रमाणेंच उच्चार होतो. ह्या नियमाला अपवादक शब्द फारच थोडे आहेत.

२२. **वाचनपाठ ५.**

bed	desk	peg
bell	hen	pen
bend	hell	ten
leg	help	red

२३. सहावा उच्चार मुख्यत्वेंकरून *ee* चा होतो.

२४. **वाचनपाठ ६.**

see	deep	peep
wheel	green	meet

२५. सातवा उच्चार अनेक स्वरांपासून होतो.

२६. **वाचनपाठ ७.**

herb	heard	son	fur
herd	bird	word	gun
lean	firm	ton	mud
earn	first	blood	run

☞ वरील शब्द वाचतांना सहज लक्षांत येईल कीं, नंबर ७ ह्याच्या पुढें *r* हा वर्ण असला तर स्वरोच्चाराला जितका वेळ लागतो, तितका दुसरा कोण्ताही वर्ण पुढें असतां लागत नाहीं.

२७. आठवा उच्चार मुख्यत्वेंकरून *i* चा होतो.

२८. **वाचनपाठ ८.**

bit	fill	kin	lip
sit	hill	rim	tin
pit	kill	tip	sip

२९. नववा उच्चार मुख्यत्वेंकरून *o* चा होतो.

३०. **वाचनपाठ ९.**

cot	mop	pod
dod	nod	pot
dot	not	rot

३१. दहावा उच्चार *oa*, *oe* ह्यांचा व कधीं कधीं *o*, *ou*, व *ow*, ह्यांचा होतो.

३२. **वाचनपाठ १०.**

road	foe	post
boat	no	mould
coal	go	soul
loaf	so	flow
doe	most	glow

३३. अकरावा उच्चार अनेक स्वरांपासून होतो.

३४. **वाचनपाठ ११.**

blew	do	moon	prude
flew	prove	noon	true
drew	food	youth	blue
screw	boom	brute	fruit

३५. बारावा उच्चार मुख्यत्वेंकरून *oo* ह्याचा होतो.

३६. **वाचनपाठ १२.**

good	look	hood
food	hook	wood
book	cook	stood

धडा ३.

संयुक्त स्वरोच्चार.

३७. इंग्रजींत **संयुक्त स्वरोच्चार** आठ आहेत. ते पुढील कोष्टकांत दिले आहेत.

३८. **कोष्टक ३.***

नंबर.	प्रत्येक संयुक्त स्वरोच्चार ज्या मुख्य स्वरोच्चारांच्या संयोगानें होतो तो.	उच्चार.	उदाहरण.
I	नंबर २ + नं० ७	**एअ**	b*a*re
II	नं० ३ + नं० ८	**आइ**	b*i*nd
III	नं० ८ + नं० ११	**इऊ** किंवा **यू**	t*u*be
IV	नं० ४ + नं० ८	—	boy
V	नं० ३ + नं० ११	**आऊ**	b*ou*nd
VI	नं० ६ + नं० ७	**ईअ**	h*ea*r
VII	नं० ३ + नं० ८ + नं० ७	**आइअ** किंवा **आय**	f*i*re
VIII	नं० ८ + नं० ११ + नं० ७	**इऊअ** किंवा **यूअ**	c*u*re

३९. वास्तविक पाहिलें तर, वरील कोष्टकांतील नंबर II, III, IV व V हे चार मात्र खरे संयुक्त स्वरोच्चार आहेत. बाकीचे सर्व ह्यांचे किंवा मुख्य स्वरोच्चारांचे अपभ्रंश आहेत. नं० I हा मुख्य स्वरोच्चारांतील नं० २ आहे; परंतु पुढील *r* ह्या वर्णाच्या जोरानें **ए** च्या पुढें **अ** चा उच्चार होत असतो, त्यामुळें संयुक्त स्वरोच्चाराचा भास होतो. नं० VI हा त्याच नंबराच्या मुख्य स्वरोच्चाराचा अपभ्रंश आहे; व नं० VII व VIII हे यथानुक्रमें नं० II व III ह्या संयुक्त

* पुढें कोठें कोठें शब्दाच्या माथ्यावर रोमन आंकडे दिलेले दिसतील ते ह्या कोष्टकांतील नंबर समजावे.

स्वरोच्चारांचे अपभ्रंश जाणावे. परंतु असें आहे तथापि शब्दांचे उच्चार बरोबर करतां यावे, म्हणून ते अपभ्रंश निराळेच संयुक्त स्वरोच्चार आहेत, असें मानणें भाग पडतें.*

४०. प्रत्येक संयुक्त स्वरोच्चार अनेक स्वरांपासून होतो.

४१. एकावयवी शब्दाच्या शेवटीं, *are, ere, air* हे वर्ण असले तर त्यांतील, *a, e,* व *ai,* ह्यांचा उच्चार नंबर I ह्याच्याप्रमाणें होतो.

४२. **वाचनपाठ १३.**

Bare, dare, hare, care, fare, share, rare, mare, pare, spare, tare; there, were, where; air, fair, hair, pair, chair.

४३. दुसरा उच्चार मुख्यत्वेंकरून *i, y, ie,* ह्यांचा होतो.

४४. **वाचनपाठ १४.**

Blind, find, kind, mild, mind, bite, dine, fine, hide, life, lime, line, mile, nine, ride, ripe, pride, cry, dry, fly, my, ply, spy, sky, try, why; die, hie, lie, pie, tie.

४५. तिसरा उच्चार *u, ue, we,* ह्यांचा होतो.

४६. **वाचनपाठ १५.**

Cube, duke, fume, mute, mule, tube, tune, use; due, hue, dew, few, hew, new, pew, stew.

४७. चौथा उच्चार *oi, oy, uoy,* ह्यांचा होतो.

---

* Our, hour, sour, flour, scour, devour, ह्या शब्दांतील *Ou* ह्यांचा उच्चार नं० v समजावा; परंतु तो नं० ३ + नं० ११ + नं० ७ ह्यांच्या संयोगानें झाल्यासारखा दिसतो. तसेंच poor, door, moor, tour, your, sure व lure ह्यांतील स्वरांचा उच्चार नं० ११ समजला पाहिजे; परंतु तो नं० ११ + नं० ७ सारखा दिसतो.

४८. **वाचनपाठ १६.**

Boil, broil, coil, coin, foil, hoist, moist, oil, point, poil, toil, void, join; boy, coy, toy; buoy.

४९. पांचवा उच्चार *ou*, व *ow* ह्यांचा होतो.

५०. **वाचनपाठ १७.**

Bound, count, cloud, found, pound, house, mount, bow, cow, down, drown, crown, gown.

५१. सहावा उच्चार *e*, *ea*, *ee*, *ie*, ह्यांचा होतो.

५२. **वाचनपाठ १८.**

Here, mere; rear, fear, hear, dear, spear, clear, beard; beer, deer, leer, peer, seer, steer, veer, fierce. pier, bier, tier.

५३. सातवा उच्चार *i* ह्याचा होतो.

५४. **वाचनपाठ १९.**

Ire, fire, spire, sire, tire, hire, mire, wire, dire, quire.*

५५. आठवा उच्चार *u* चा होतो; जसें :—cure, dure, pure.

घडा ४.

व्यंजन.

५६. पुढें *a*, *o*, *u*, *l*, *r*, *t*, ह्यांपैकीं कोणताही वर्ण असतां किंवा पदान्तीं *c* चा उच्चार क् असा होतो; परंतु *e*, *i*,

---

* *Qu* ह्याचा उच्चार बहुतकरून क् असा होतो. पृ० १४ कलम ६० पहा.

किंवा *y* हा वर्ण पुढें असला तर स् असा होतो. *Ea*, *ia*, *ie*, *io*, ह्यांच्या पूर्वी *c* चा उच्चार श् असा होतो. Con*ceal* ह्या शब्दांत दुसऱ्या *c* च्या पुढें *ea* असूनही त्याचा उच्चार स असाच होतो.

Ch चे उच्चार तीन आहेत. १. बहुतकरून त्याचा उच्चार च् असा होतो. २. ग्रीक भाषेपासून निघालेल्या शब्दांत त्याचा उच्चार क् असा होतो; जसें :—*Ch*orus. ३. फ्रेंच भाषेंतून जे शब्द इंग्रजींत मिसळलेले आहेत, त्यांतील *ch* चा उच्चार श् असा होतो; जसें :—*ch*aise शेज्.

Ck याचा उच्चार नेहमीं क् असा होतो.

५७. वाचनपाठ २०.

*C*ab, *c*ake, *c*ane, *c*all, *c*ap, *c*oat, *c*oal, *c*oast, *c*old, *c*ount, *c*ost, *c*ube, *c*urb, *c*ut, *c*laim, *c*lear, *c*lub, *c*ream, *c*loud, *c*rime, *c*rest, ta*c*t, pi*c*nic, *c*ell, *c*ite, *c*ellar, *c*ymbol; o*c*ean, so*c*ial, spe*c*ies. *Ch*air, *ch*in, *ch*arm, *ch*eek, *ch*eap, tea*ch*, ri*ch*, *ch*ur*ch*, *ch*oice, ra*c*e, bu*ck*, du*ck*, ro*ck*, mo*ck*.

५८. *A*, *o*, *u*, *l*, *r*, ह्यांपैकीं कोणताही वर्ण पुढें असतां किंवा शब्दाच्या अंतीं *g* चा उच्चार ग् असा होतो. Gaol, (जेल्) हा शब्द ह्या नियमाला बाधक आहे. *E*, *i*, व *y*, ह्यांच्या पूर्वी *g* चा उच्चार ज् असा होतो; परंतु *g* चें द्वित्व असलें तर, किंवा विशेषणांना *er* व *est* हे प्रत्यय लागतात, त्यांच्या पूर्वी, *g* चा उच्चार ग् असाच होतो; जसें :—sta*gg*er, tri*gg*er, cra*gg*y, lon*g*er, lon*g*est. कांहीं शब्दांत *g* च्या पुढें *e* किंवा *i* असूनही त्याचा उच्चार ग्

असाच होतो; जसें :—*g*et, *g*eese, (**गीज्**), an*g*er, fin*g*er, *g*iddy, *g*ive, tar*g*et, इत्यादि.

Gh चे उच्चार चार. १. **ग्**, उदाहरणें:-*gh*ost, *gh*astly, २. **फ्**, उदाहरणें:-cou*gh*, enou*gh*, rou*gh*, tou*gh*, lau*gh*. ३. **क्**, उदाहरणें :—hou*gh*, lou*gh*. ४. **प्**, उदाहरण—hiccou*gh* (**हिकप्**).

५९. **वाचनपाठ २१.**

*G*ain, *g*ale, *g*oat, *g*old, *g*ood, *g*ulf, *g*um, *g*un, *g*lass, *g*loss, *g*reen, *g*round, *g*reat; ba*g*, be*g*, bi*g*, lon*g*, run*g*, fla*g*, pan*g*, *g*em, *g*in, *g*in*g*er, stran*g*e, ca*g*e, pa*g*e.

६०. *Q* च्या पुढें नेहमीं *u* येत असतो व दोहोंचा मिळून उच्चार **क्व** असा होतो; जसें :—*qu*een. कांहीं शब्दांत *qu* चा उच्चार **क्** असा होतो; जसें :—con*qu*er.

६१. *R* च्या पुढें स्वर असला तर, मराठी **र्** पेक्षां मृदु, आणि व्यंजन असलें तर, त्याहीपेक्षां मृदु उच्चार होतो; जसें :—*R*ome, *r*ender, *r*evenge; ba*r*d, bi*r*d.

६२. *S* चा मुख्य उच्चार **स्**; परंतु कांहीं शब्दांच्या उपांतीं व अंतीं* **ज्** सारखा होतो; जसें :-mu*s*e, wa*s*, व *s*ure, *s*ugar, ह्या शब्दांत *s* चा उच्चार **श्**, plea*s*ure, व lei*s*ure, ह्यांत **ज्** असा होतो.

Sc ह्याच्या पुढें *a*, *o*, *u*, किंवा *r* असला तर **स्क्** आणि किंवा *i* असला तर **स्** असा उच्चार होतो.

Sch चा नेहमीं **स्क्** असा उच्चार होतो.

---

* भा० क० १३ व क० ४० पहा.

Sh चा नेहमीं श्.

६३. वाचनपाठ २२.

*S*age, *s*ale, *s*ell, *s*end, *s*ilk, *s*ong, *s*oft, *s*ort, *s*ail, *s*aint, *s*oon, *s*mell, *s*late, *s*nake, *s*nail, *s*mall. *Sc*ale, *sc*ar, *sc*old, *sc*orch, *sc*orn, *sc*our, *sc*um, *sc*rape, *sc*rew. *Sc*ene, *sc*ent, *sc*ience, *sc*eptre. *Sch*eme, *sch*ool. *Sh*are, *sh*aft, *sh*ake, *sh*ame.

६४. *T* च्या पुढें *u* असून मागल्या शब्दावयवावर* जोर असला तर, च् असा उच्चार होतो; जसें :—

na'*t*ure, fea'*t*ure, rup'*t*ure, vir'*t*ue.

Ti च्या पुढें स्वर असला तर बहुधा श् असा उच्चार होतो; जसें :—par*ti*al.

Th चे उच्चार दोन†—द् (उ० *th*us) आणि थ् (उ० *th*ink). कांहीं शब्दांत *th* चा ट् असाही उच्चार होतो; जसें :—*Th*omas, *Th*ames.

६५. वाचनपाठ २३.

*Th*an, *th*at, *th*ou, *th*ee, *th*em, *th*en, *th*ence, *th*e, *th*is, *th*ese, *th*ose, *th*y, ba*th*e, brea*th*e. *Th*ank, *th*aw, *th*eft, *th*eme, *th*ick, *th*in, *th*ink, *th*ree, *th*roat, *th*rong, *th*row, *th*rust, heal*th*, brea*th*, tru*th*, smi*th*, too*th*.

---

* इंग्रजी शब्दांत जितके स्वरोच्चार असतात, त्या प्रत्येकास एक किंवा अधिक व्यंजनांसहित किंवा व्यंजन नसलें तर व्यंजनाव्यतिरिक्त त्या शब्दाचा अवयव (*syllable*) असें म्हणतात.

† पृ० ४ क० ४ यांत *th* च्या उच्चाराविषयीं काय सांगितलें आहे तें पाहू.

६६. *W* चा उच्चार नवव्या कलमांत दिला आहे. *Wh* ह्याचा उच्चार *w* सारखाच होतो म्हटलें तरी चालेल.

६७. **वाचनपाठ २४.**

*W*ade, *w*ake, *w*eed, *w*eek, *w*eak, *w*ill, *w*ind, *w*ing, *w*ise (**वाइज्**), *w*ine, *w*ife, *w*ish, *w*all, *w*ell, *w*ealth. *Wh*ale, *wh*eel, *wh*et, *wh*ile, *wh*im, *wh*ine, *wh*ip, *wh*ite, *wh*y.

६८. *X* चे उच्चार तीन. १. शब्दांत ज्या अवयवावर जोर असेल त्याच अवयवाच्या अंतीं असला तर (जसें :—e*x*'it, e*x*'cellence), किंवा पुढल्या अवयवावर जोर असून त्याच अवयवाच्या आरंभीं व्यंजन असलें तर (जसें :—e*x*tent') कधीं कधीं *x* चा उच्चार **क्स्** असा होतो. २. परंतु बहुतकरून *x* चा **ग्झ्** असा उच्चार फार; जसें :—e*x*ample, e*x*ist. ३. ग्रीक भाषेंतील विशेषनामांच्या आरंभीं *x* चा झ् असा उच्चार होतो; जसें :—*X*enophone (झेनोफोन).

धडा ५.

शब्दांचे उच्चार.

६९. इंग्रजी शब्दांचे उच्चार करतांना त्यांच्या कांहीं अवयवांवर विशेष जोर द्यावा लागतो, त्यास Accent असें म्हणतात; जसें :—vir'tue ह्या शब्दांत *vir* ह्या अवयवावर accent आहे.

७०. शब्दाच्या पहिल्या अवयवावर जोर देण्याचा अलीकडे इंग्रजी भाषेंत फार संप्रदाय पडत चालला आहे.

७१. एकावयवी शब्दांवर जोर द्यावा लागत नाहीं.

७२. दोन अवयव असले तर कधीं कधीं पहिल्या अवयवावर जोर असतो; जसें :—gar'den, ham'mer, good'-ness, free'dom, व कधीं कधीं दुसऱ्यावर असतो; जसें :—bedew', before', begin', forget'.

७३. तोच शब्द जर कधीं कधीं नाम किंवा विशेषण व कधीं कधीं क्रियापद होऊं शकत असला तर, नाम किंवा विशेषण असतां जोर पहिल्या अवयवावर व क्रियापद असतां दुसऱ्या अवयवावर पडतो.

उदाहरणें :—

नाम.	क्रियापद.
con'vert	convert'
ob'ject	object'
ab'stract	abstract'
pres'ent	present'
com'pound	compound'

७४. तीन अवयव असले तर, बहुधा पहिल्यावर व तिसऱ्यावर जोर द्यावा लागतो; परंतु कांहीं शब्दांत मधल्या अवयवावर मात्र जोर असतो.* उदाहरणें :—

in'terrupt', com'prehend'; hori'zon, commit'tee.

* शब्दांतल्या कोणत्या अवयवावर जोर द्यावा, हें कोशावरून समजतें. वाक्य वाचतांनाही कांहीं शब्दांवर जोर द्यावा लागतो, त्यास *Emphasis* म्हणतात.

७५. वाचनपाठ २५.

" Go to the ant, thou slug'gard, consid'er her ways and be wise; which, hav'ing no guide, o'verseer' or ru'ler, provi'deth her meet in the sum'mer, and gath'-ereth her food in the har'vest. How long wilt thou sleep, O slug'gard? When wilt thou arise' out of thy sleep? Yet a lit'tle sleep, a lit'tle slum'ber, a lit'-tle fold'ing of the hands to sleep. So shall thy poverty come as one that trav'elleth, and thy want as an arm'ed man."

भाषांतरपाठमाला

भाग १

धडा १.

वर्तमान काळ—प्रथम पुरुष.

१. I (**मी**) ह्या प्रथमपुरुषवाचक सर्वनामाच्या संबंधानें इंग्रजींत नुसत्या क्रियापदावरून **वर्तमान काळीं प्रथम पुरुषाच्या एकवचनाचा** अर्थ होतो; जसें :-I go, **मी जातों.**

२. मराठींत वर्तमान काळीं लिंगाप्रमाणें क्रियापदाचें रूप बदलतें, परंतु इंग्रजींत तसें होत नाहीं; जसें :—
I go, **मी जातों—त्यें—तें.**

३. **शब्दसंग्रह १.**

बसणें,	to sit.	(अ०)	पडणें,	to fall.†	(अ०)
धांवणें,	to run.	(अ०)	ऐकणें,	to hear.	(स०)
येणें,	to come.*	(अ०)	खाणें,	to eat.	(स०)
थांबणें, थांबविणें,	to stop.	(अ० व स०)	निजणें,	to sleep.	(अ०)
उभें राहाणें,	to stand.	(अ०)	चालणें,	to walk.‡	(अ०)

भाषांतरपाठ १.

४.—१. मी बसतें. २. मी येतें. ३. मी थांबतों. ४. मी धांवतों. ५. मी चालतों. ६. मी उभी राहतें. ७. मी ऐकतें. ८. मी पडतों. ९. मी खातों. १०. मी उभा राहतों.

---

* वाचनविचार, क्र० १६ † पहा.

† वाचनविचार, क्र० २० § पहा.

‡ *L* च्या पुढें *d*, *k*, किंवा *m*, असला तर, कित्येक शब्दांत *l* ह्याचा उच्चार होत नाहीं; जसें:—cou*l*d, wou*l*d, shou*l*d, ha*l*f, ca*l*f, ta*l*k, wa*l*k, ca*l*m.

धडा २.

वर्तमान काळ—द्वितीय पुरुष.

५. क्रियापदाला *est* हा प्रत्यय लाविला म्हणजे **वर्तमान काळाचें द्वितीय पुरुषाचें एकवचन** सिद्ध होतें; जसें:— Thou go*est*, **तूं जातोस–तेस–तेंस.**

६. एकावयवी क्रियापदाच्या अंतीं एकच व्यंजन व त्या व्यंजनाच्या पूर्वीं एकच स्वर असतां, *est* हा प्रत्यय लावतांना अंत्य व्यंजनाचें द्वित्व होतें; जसें:—Thou run*nest*, **तूं धांवतोस–तेस–तेंस.**

७. इतर क्रियापदांच्या अंतीं एकच व्यंजन व त्या व्यंजनाच्या पूर्वीं एकच स्वर असून, **अंत्य अवयवावर जोर असला,** तर *est* हा प्रत्यय लावतांना अंत्य व्यंजनाचें द्वित्व होतें;* जसें:—to permit' **परवानगी देणें,** Thou permit'*test* **तूं परवानगी देतोस–तेस–तेंस.**

८. क्रियापदाचें उपांत्य अक्षर व्यंजन व अंत्याक्षर *y* असलें तर *est* हा प्रत्यय लावतांना *y* च्या जागीं *i* हा वर्ण येतो; जसें:—to cry **रडणें,** Thou cr*iest* **तूं रडतोस–तेस–तेंस.**

९. क्रियापदाचें अंत्याक्षर *e* असलें तर *st* हा प्रत्यय लागतो; जसें:—to come, Thou come*st*' **तूं येतोस–तेस–तेंस.**

१०. ☞ *Est* किंवा *st* हा प्रत्यय लागून सिद्ध झालेलीं क्रियापदांचीं रूपें बहुतकरून धर्मशास्त्रांत व कवितेंत फार आढळतात. एरवीं जेथें जेथें मराठींत द्वितीय पुरुषाच्या एकवचनाचा प्रयोग होतो, तेथें इंग्रजींत त्याच पुरुषाच्या अनेकवचनाचा प्रयोग करण्याचा प्रघात आहे.

---

* सुमारें पंचवीस क्रियापदें, अंत्य पदावर जोर नसूनही, ह्या नियमास अनुसरतात; जसें:—to e'qual बरोबरी करणें, to level सपाट करणें, वगैरे.

११. शब्दसंग्रह २.

भिणें,	to fear.	(स०)	लिहिणें,	to write.‡	(स०)
हंसणें,	to laugh.*	(अ०)	पाहणें,	to see.	(स०)
शिकणें,	to learn.	(स०)	घेणें,	to take.	(स०)
शिकविणें,	to teach.	(स०)	देणें,	to give.	(स०)
गाणें,	to sing.	(स० व अ०)	विकणें,	to sell.†	(स०)
बोलावणें,	to call.†	(स०)	विकत घेणें,	to buy.	(स०)
काम करणें,	to work.	(अ०)	उडणें,	to fly.	(अ०)
खणणें,	to dig.	(स० व अ०)	खेळणें,	to play.	(अ०)

भाषांतरपाठ २.

१२. शब्दसंग्रह १ व २ ह्यांतील क्रियापदांचीं वर्तमान काळ, द्वितीय पुरुष एकवचन असतां जीं रूपें होतात तीं भाषांतरासहित सांगा.

धडा ३.

वर्तमान काळ—तृतीय पुरुष.

१३. क्रियापदाला *s* हा प्रत्यय§ लाविला, म्हणजे **वर्तमान काळाचें तृतीय पुरुषाचें एकवचन** सिद्ध होतें; जसें :-to run, *He* runs **तो धांवतो,** *She* runs **ती धांवते,** *It* runs **तें धांवतें.**

---

* कांहीं शब्दांच्या शेवटल्या *gh* चा उच्चार *f* च्या उच्चारासारखा होतो. वाचनविचार, क० ५८, *gh* चे उच्चार पहा.

† वाचनविचार, क० २०, § पहा.

‡ *W* च्या पुढें *r* असला तर *w* चा उच्चार होत नाहीं.

§ क्रियापदाचें अंत्याक्षर *f*, *k*, *p*, किंवा *t* असलें तर *s* चा उच्चार स् सारखा होतो; परंतु *b*, *d*, *g*, *l*, *m*, *n*, *r*, किंवा एखादा स्वर असला तर झ् सारखा होतो.

१४. क्रियापदाचें अंत्याक्षर *s, sh, ch, z* किंवा *c* असलें, तर *es** हा प्रत्यय लागतो; जसें :—to teach, He teach*es* **तो शिकवितो;** to go, He go*es* **तो जातो.**

१५. क्रियापदाचें उपांत्याक्षर व्यंजन व अंत्याक्षर *y* असतां *es*† हा प्रत्यय लागतो, व तो लागतांना *y* च्या जागीं *i* हा वर्ण येतो; जसें :—to cry, He cr*ies* **तो रडतो.**

१६. शब्दसंग्रह ३.

करणें,	to do[११].‡	(स०)	सुकविणें,	to dry[११].	(स०)
वाचणें,	to read[६].	(स० व अ०)	पोहणें,	to swim[८].	(अ०)
मारणें,	to beat[६].	(स०)	पिणें,	to drink[८].	(स०)
पकडणें,	to catch[१].§	(स०)	भुंकणें,	to bark[३].	(अ०)
पोहोंचणें,	to reach[६].	(स०)	फेंकणें,	to throw[१०].	(स०)

भाषांतरपाठ ३.

१७. शब्दसंग्रह १, २ व ३ ह्यांतील क्रियापदांचीं वर्तमान काळ, तृतीय पुरुष, एकवचन असतां जीं रूपें होतात, तीं भाषांतरासहित सांगा; व खालीं लिहिलेल्या वाक्यांचें भाषांतर करा.

१. तो वाचतो. २. मी सुकवितों. ३. ती खेळते. ४. तें हंसतें. ५. तो पोहतो. ६. तो घेतो. ७. ती गाते. ८. तें बोलावतें. ९. तो येतो. १०. तें रडतें. ११. तो विकत घेतो.

---

* *Es* ह्या प्रत्ययाचा उच्चार बहुतकरून एस् असा होतो; क्रियापदाचें अंत्याक्षर *o* किंवा *y* असलें तर मात्र ज् सारखा होतो.

† पृ० २२, कलम ८ पहा.

‡ Does चा उच्चार डज् असा होतो. द्वितीय पुरुषाचीं Doest व dost अशीं दोन रूपें होतात. To do हें जेव्हां सहाय क्रियापद असतें, तेव्हां मात्र dost हें रूप आढळतें.

§ *Ch* च्या पूर्वीं *t* हा उच्चार होत नाहीं.

१२. शिकते. १३. तो खणतो. १४. तो सुकवितो. १५. तो देतो.

धडा ४.

वर्तमान काळ—अनेकवचन.

१८. कर्त्याच्या संबंधानें नुसत्या क्रियापदावरून वर्तमान काळीं प्रथम, द्वितीय व तृतीय पुरुषाच्या अनेकवचनाचा अर्थ होतो; जसें :—*We* run **आम्ही धांवतों,** *You* run **तुम्ही धांवतां,** *They* run **ते, त्या, तीं धांवतात.**

१९. वर्तमान काळाचीं रूपें स्पष्ट लक्षांत यावीं, म्हणून to write हें क्रियापद खालीं चालविलें आहे.

	एकवचन.	**अनेकवचन.**
प्र० पु०	*I* write,	*We* write.
द्वि० पु०	*Thou* writest,	*You* write.
तृ० पु०	*He, she, it* writes,	*They* write.

२०. **शब्दसंग्रह ४.**

चिरडणें,	to crush. (स०)	आणणें,	to bring.	(स०)
बोलणें,	to talk.* (अ०)	गुडघे टेंकणें,	to kneel †	(अ०)
कोमेजणें,	to fade. (अ०)	सरणें, हालणें, हालविणें,	to move.	(स० व अ०)
प्रकाशणें,	to shine. (अ०)	बुडणें, बुडविणें,	to sink.	(स० व अ०)
अंग धुणें,	to bathe. (अ०)	मान डोलावणें,	to nod.	(अ०)

भाषांतरपाठ ४.

२१. खालच्या वाक्यांत इंग्रजींत जेथें जेथें द्वितीय पुरुषाचें अनेकवचन

---

* पृ० २१, टीप ‡ पहा.

† पुढें *n* असला तर *k* चा उच्चार होत नाहीं.

असेल तेथें तेथें मराठींत एकवचन व अनेकवचन घालून दोन दोन भाषांतरें करावीं; व मराठींत जेथें द्वितीय पुरुषाचें एकवचन असेल तेथें इंग्रजींत त्याच पुरुषाचें अनेकवचन घालावें.

१. *We* walk. २. *He* teaches. ३. *She* sees. ४. *You* come. ५. *He* calls. ६. *We* fear. ७. *You* laugh. ८. *You* hear. ९. *They* fall. १०. *You* nod. ११. *They* sleep. १२. *You* talk. १३. *We* play. १४. *They* sing. १५. *It* fades. १६. *They* kneel. १७. *You* swim. १८. *It* moves. १९. *Thou* fearest. २०. *We* bathe. २१. *It* sinks. २२. *She* calls. २३. *They* stand. २४. *It* flies. २५. *I* learn.

१. आम्ही येतों. २. तुम्ही बोलतां. ३. तुम्ही मारतां. ४. आम्ही सुकवितों. ५. ते विकतात. ६. ते हंसतात. ७. त्या बोलावतात. ८. तें खेळतें. ९. ते लिहितात. १०. तें रडतें. ११. आम्ही वाचतों. १२. तीं काम करतात. १३. त्या गातात. १४. ते बसतात. १५. तीं कोमेजतात. १६. तो बोलतो. १७. ती भिते. १८. तीं रडतात. १९. तो प्रकाशतो. २०. तें फेंकतें. २१. तुम्ही आणतां. २२. तीं पितात. २३. तूं मरतोस. २४. तूं सरतोस. २५. तूं हंसतोस.

धडा ५.

रीतिवर्तमान काळ.

२२. इंग्रजींत वर्तमान काळाच्या रूपांवरून **रीतिवर्तमान** काळाचाही अर्थ होतो; जसें :—He comes **तो येतो,** किंवा **तो येत असतो.** भाषांतर करतांना वर्तमान काळ घालावा किंवा रीतिवर्तमान काळ घालावा, हें अर्थावरून समजावें.

२३. **शब्दसंग्रह ५.**

उडी मारणें, to jump. (अ०) नाचणें, to dance. (अ०)

वाढणें,	to grow.[10]	(अ०)	पाप करणें,	to sin.	(अ०)
वितळणें, वितळविणें,	to melt.[5] (स० व अ०)		चुकणें,	to err.[7]	(अ०)
लढणें,	to fight.[11]*	(अ०)	मरणें,	to die.[11]	(अ०)
खोटें बोलणें,	to lie.[11]	(अ०)	राहणें, जिवंत असणें,	to live.	(अ०)

भाषांतरपाठ ५.

२४.—१. ते जात असतात. २. तो खोटें बोलत असतो. ३. ती वाचीत असते. ४. ते लढतात. ५. ती नाचत असते. ६. तें वितळतें. ७. तें वाढतें. ८. आम्ही चुकतों. ९. तुम्ही विकीत असतां. १०. तो पाप करतो. ११. आम्ही मरतों. १२. तो जिवंत आहे.

१. You lie. २. He sins. ३. He jumps. ४. They see. ५. You laugh. ६. They dance. ७. I sing. ८. They fight. ९. We come. १०. She lives. ११. It swims. १२. It shines.

धडा ६.

प्रथमा—उपपदें.

२५. एखादें नाम किंवा सर्वनाम क्रियापदाचें उद्देश्य असलें म्हणजे त्याची **प्रथमा** विभक्ति समजावी.

२६. एकवचनी सामान्य नामाच्या पूर्वी, एखादा षष्ठ्यंत शब्द, दर्शक सर्वनाम, किंवा सामान्य सर्वनाम नसलें तर, **उपपद** घालण्याची इंग्रजींत चाल आहे; जसें :—*My*[11] book,[12] **माझें पुस्तक;** *This*[8] book, **हें पुस्तक;** *Every*[5][8] book, **प्रत्येक पुस्तक;** *A*[7] book, **पुस्तक.**

---

* *gh* ह्याच्या पूर्वी *i* किंवा पुढें *t* असला तर *gh* ह्याचा उच्चार होत नाहीं.

२७. इंग्रजींत दोन उपपदें (Ar'ticles) आहेत :—an किंवा a आणि the.* An किंवा a ह्याला Indefinite Article **अनियामक उपपद** व the ह्याला Def'inite Article **नियामक उपपद** म्हणतात.

२८. अनेकांतून **कोणत्याही एका** व्यक्तीविषयीं बोलावयाचें असल्यास, नामापूर्वी an किंवा a घालावें; जसें :—*A* book (एक) पुस्तक.

२९. नामाचा पहिला वर्ण, एखादा स्वर किंवा अनुच्चारित *h* हा असला तर, पूर्वी an हें उपपद येतें आणि एखादें व्यंजन असलें तर a येतें; जसें :—

An umbrella, **एक छत्री.** *A man*, **एक पुरुष.**
An hour, **एक तास.** *A hat*, **एक टोपी.**

३०. अनेकांतून **अमुकच** व्यक्तीविषयीं बोलावयाचें असल्यास, त्या नामाच्या पूर्वी the घालावें; जसें :—the book (तें) पुस्तक, (जें आपणास ठाऊक आहे तें).

३१. ☞ यद्यपि an किंवा a ह्यानें **कोणत्याही एका** व the ह्यानें **अमुकच** व्यक्तीचा **बोध** होतो, तथापि ह्या उपपदांवर विशेष जोर असल्याशिवाय किंवा तीं सोडल्यानें अर्थाविषयीं संशय येत असल्याशिवाय त्यांचें मराठींत भाषांतर करण्याची कांहीं गरज नाहीं. बहुधा तीं भाषांतर करतांना सोडून द्यावीं हें बरें; कारण मराठींत उपपदांचा उपयोग करण्याचा संप्रदाय मुळींच नाहीं. **कोणत्याही एका** व्यक्तीविषयीं किंवा **अमुकच** व्यक्तीविषयीं बोलणें आहे, हें बहुधा अर्थावरून समजतें; म्हणून मराठींत नुसत्या नामापासून उपपदांचें कार्य होतें, परंतु इंग्रजींत एकवचनी नामाच्या पूर्वी एखादा व्यक्तिबोधक शब्द नसला तर, उपपद अवश्य असलें पाहिजे.

---

* The ह्या शब्दाच्या पुढें स्वर असला तर **दी** असा उच्चार होतो आणि व्यंजन असलें तर **दि** असा होतो; जसें :-The *air* **(दी एअर).** The *men* **(दि मेन्).** —Howard's Second Book, Pt. I, पृ०27, टीप पहा.

३२. शब्दसंग्रह ६.

बैल,	an ox.	मूर्ख, (वि०)	a fool.
प्राणी,	an animal.*	जहाज,	a ship.
पक्षी,	a bird.	दगड,	a stone.
कुत्रा,	a dog.	वृक्ष, झाड,	a tree.
मुलगा,	a boy.	फूल,	a flower.†
मुलगी,	a girl.	तारा,	a star.
शिक्षक, धनी,	a mas'ter.†	सूर्य,	the sun.
चाकर,	a serv'ant.	चंद्र,	the moon.

३३. इंग्रजी वाक्याचा मासला—

The sun shines.

सूर्य प्रकाशतो.

भाषांतरपाठ ६.

३४.—१. *The* girl sings. २. *The* boy reads. ३. *The* man comes. ४. *A* bird flies. ५. *The* bird flies. ६. *The* flower fades. ७. *An* animal dies. ८. *The* master teaches. ९. *The* dog barks. १०. *The* girl plays. ११. *The* ox runs. १२. *The* star shines.

१. मुलगा धांवतो. २. मुलगी शिकते. ३. चंद्र प्रकाशतो. ४. जहाज बुडतें. ५. झाड वाढतें. ६. कुत्रा भुंकत असतो. ७. तो मनुष्य खोटें बोलत असतो. ८. तो पक्षी जिवंत आहे. ९. चाकर बोलतो. १०. तो काम करतो. ११. मुलगा पोहतो. १२. दगड बुडतो.

---

* शब्दाच्या शेवटच्या *al* चा चमत्कारिक उच्चार होतो, तो शिक्षकापासून शिकावा.

† शब्दाच्या शेवटच्या *ar*, *er*, *or*, *our* किंवा *re* ह्यांचा बहुतकरून अर् असा उच्चार होतो.

धडा ७.

द्वितीया.

३५. इंग्रजींत कर्माची नेहमीं द्वितीया विभक्ति असते.

३६. नामांची द्वितीया प्रथमेसारखीच असते; एखादें नाम क्रियापदाचें कर्म असलें म्हणजे, त्याची द्वितीया विभक्ति समजावी.

३७. मराठींत क्रियापदाच्या पूर्वीं कर्म येतें, परंतु इंग्रजींत तें पुढें असतें; जसें :—

The boy reads *a book.*

मुलगा पुस्तक वाचतो.

He beats *the ox.*

तो बैलाला मारतो.

ह्या वाक्यांत a book व the ox ह्या नामांची द्वितीया विभक्ति समजावी.

३८. शब्दसंग्रह ७.

सिंह,	a lion. [७]	पेटी,	a box. [९]
चोर,	a thief. [६]	अंगरखा,	a coat. [१०]
धडा,	a les'son.* [५]	बंडी,	a waist'coat. [२]
गाणें,	a song.	आवाज,	a sound. [४]
फळ,	a fruit. [११]	खरें, खरी गोष्ट,	a truth. [१२]
खांच,	a pit. [८]	पाटी,	a slate. [२]

* शब्दाच्या शेवटच्या *on* ह्याचा कधीं कधीं चमत्कारिक उच्चार होत असतो, तो शिक्षकापासून शिकावा.

सुरी,	a knife.*	किनारा (समुद्राचा),	the shore.
चाकू,	a pen'knife.*	तीर (नदीचें),	the bank.
लेखणी,	a pen.	पाठविणें,	to send. (स॰)
पेन्सिल,	a pen'cil.	नीट करणें,	to mend. (स॰)

भाषांतरपाठ ७.

३९.—१. तो लेखणी नीट करतो. २. मी आवाज ऐकतों. ३. (तो) पुरुष (तें) फळ विकत घेतो. ४. (ती) मुलगी गाणें गात असते. ५. पंतोजी मुलाला शिकवितो. ६. ते (त्या) कुत्र्याला मारीत असतात. ७. तो पक्ष्याला पकडतो. ८. धनी चाकराला बोलावतो. ९. तूं खांच खणतोस. १०. आम्ही जहाज पहातों. ११. तो धडा शिकतो. १२. तूं निजतोस.

१. The ship reaches *the shore.* २. They catch *the thief.* ३. He sells *the coat.* ४. We hear *the truth.* ५. He throws *a stone.* ६. The master sends *a servant.* ७. The man calls *the boy.* ८. He reaches *the bank.* ९. He stops *the thief.* १०. The boy fears *the lion.* ११. We hear *a sound.* १२. The bird eats *the fruit.*

धडा ८.

नामांचें अनेकवचन व उपपदें (पुढें चालू).

४०. नामाच्या एकवचनाला *s*† हा प्रत्यय लाविला म्हणजे **अनेकवचन** सिद्ध होतें; जसें :—A boy, Boys मुलगे.

---

* पृ० २५ टीप † पहा.

† *S* ह्याच्या उच्चाराविषयीं पृष्ठ २३ टीप § पहा.

४१. नामांचें अंत्याक्षर *s, sh, ch, x, z,* किंवा *o** असलें तर *es*† हा प्रत्यय लागतो; जसें :—A box, Box*es* **पेट्या.**

४२. नामांचें उपांत्याक्षर व्यंजन व अंत्याक्षर *y* असलें तर *es* हा प्रत्यय लागतो; व तो लागतांना *y* ह्याच्या जागीं *i* हा वर्ण येतो; जसें :—A fly **माशी,** Fl*ies* **माशा.**

४३. कांहीं नामांच्या शेवटीं *f* किंवा *fe* हे वर्ण असतात, त्यांच्या ठिकाणीं अनेकवचनीं *ves* हा आदेश होतो—

एकवचन.		अनेकवचन.
A wolf,	लांडगा,	wol*ves.*
A calf,‡	वासरूं,	cal*ves.*
A thief,	भामट्या, चोर,	thie*ves.*
A wife,	पत्नी,	wi*ves.*
A knife,	सुरी,	kni*ves.*

४४. कांहीं नामांचें अनेकवचन निराळ्याच रीतीनें सिद्ध होतें; जसें :—

एकवचन.		अनेकवचन.
A man,	पुरुष, मनुष्य,	men.
A wo'man,	स्त्री,	wo'men.
An ox,	बैल,	ox'*en.*
A child,	मूल,	child*ren.*
A mouse,	उंदीर,	m*ice.*
A louse,	ऊ,	l*ice.*

---

* कांहीं नामांचें अंत्याक्षर *o* असून त्यांस *s* हाच प्रत्यय लागतो; जसें : canto, quarto, इ०.

† *Es* ह्याच्या उच्चाराकरितां पृ० २४, टीप * पहा.

‡ पृ० २१, टीप ‡ पहा.

४५. An किंवा a हें उपपद, एका व्यक्तीचें बोधक असल्यामुळें, एकवचनी नामाच्या पूर्वीं मात्र येतें; परंतु the हें उभयवचनीं येऊं शकतें; जसें :—*The* horse **(तो) घोडा,** *The* horses **ते घोडे.**

४६. एखाद्या प्रकारच्या सर्व व्यक्तींविषयीं बोलावयाचें असल्यास नामाचें नुसतें अनेकवचन घ्यावें, नाहीं तर एकवचन घेऊन पूर्वीं the घालावें; जसें :—Horses, किंवा the horse, **घोडे, घोडा हें जनावर.**

४७. Man ह्या शब्दाचा अर्थ **मनुष्यें, मनुष्यमात्र, नरजाति,** असा असला तर नुसतें अनेकवचन, नाहीं तर नुसतें एकवचन योजावें; जसें :—

Men laugh,

किंवा Man laughs,

मनुष्यें हंसतात.

Woman ह्या शब्दाचा अर्थ **स्त्रीजाति, स्त्रिया,** असा असला तर हाच नियम लागतो.

४८. शब्दसंग्रह ८.

घर,	a house.	बांधणें,	to build.	(स०)
घरटें,	a nest.	लपविणें,	to hide.	(स०)
विहीर,	a well.	बंद करणें,	to shut.	(स०)
दरवाजा,	a door.	भिवविणें,	to fright'en*	(स०)
भिंत,	a wall.	दाखविणें,	to show.	(स०)

* शब्दाच्या शेवटच्या *en* ह्याचा चमत्कारिक उच्चार होतो, तो शिक्षकापासून शिकावा.

गाय,	a cow.[2]	जाणणें, ओळखणें,	to know.[10] †	(स०)
रस्ता,	a street.[6] *	हंबरणें,	to low.[10]	(अ०)
सडक, रस्ता,	a road.[10] *	डरकाळी फोडणें,	to bel'low[5, 10] ‡	(अ०)
मार्ग, वाट,	a way.	खेंकाळणें,	to neigh.[2] §	(अ०)
घोडा,	a horse.[4]	बैल,	a bull.[12]	

भाषांतरपाठ ८.

४९.—१. The servant shuts the doors. २. The master beats the boys. ३. The ships reach the shore. ४. The boy catches fl*ies*. ५. The cow*s* low. ६. The bull*s* bellow. ७. Horse*s* neigh. ८. The wom*en* teach the girl*s*. ९. I know the m*en*. १०. They hear the song*s*. ११. Animal*s* die. १२. Thie*ves* hide the box*es*. १३. He frightens the child*ren*. १४. He frightens child*ren*. १५. The bird*s* eat the fruit*s*.

१. पक्षी घरटीं बांधतात. २. मनुष्यें घरें बांधतात. ३. त्या सिंहाला भितात. ४. मनुष्यें सिंहाला भितात. ५. पक्षी उडतात. ६. झाडें वाढतात. ७. मनुष्यें मरण पावतात. ८. त्या पुस्तकें वाचतात. ९. तो सुऱ्या विकत घेतो. १०. चाकर दरवाजे बंद करितात. ११. पोरें खांचा खणतात. १२. तो अंगरखे लपवितो. १३. गाई हंबरतात. १४. तो वाट दाखवितो. १५. ते भिंती बांधतात.

---

* गांवांतील मोठाल्या रस्त्यांना streets म्हणावें व एका गांवाहून दुसऱ्या गांवाला जाण्याच्या सडकांना roads म्हणावें.

† पृ० २५, टीप † पहा.

‡ पृ० ७, टीप § पहा.

§ पृ० २७, टीप * पहा.

धडा ९.

विशेषणें.

५०. नामाच्या पूर्वी विशेषण असलें तर उपपद त्याच्या पूर्वी घालावें;* जसें :—A *good* boy **चांगला मुलगा.**

५१. मराठींत जसें विशेषणांस (आकारान्त विशेषणें खेरीजकरून) लिंगाचीं व वचनाचीं कार्यें होत नाहींत, त्याचप्रमाणें इंग्रजींत प्रकार आहे; जसें :—

A bad boy,	**वाईट मुलगा.**	*bad* boys,	**वाईट मुलगे.**
A bad girl,	**वाईट मुलगी.**	*bad* girls,	**वाईट मुली.**
A bad child,	**वाईट मूल.**	*bad* children,	**वाईट मुलें.**

५२. **शब्दसंग्रह ९.**

चांगला-ली-लें,	good.	लहान,	small.
उंच,	tall.	गोड,	sweet.
पवित्र,	ho'ly.	कडू,	bit'ter.‡
बळकट, मजबूत,	strong.	सुरेख, निरभ्र,	fair.
अशक्त,	weak.		
चकचकीत,	bright.†	गरीब, बिचारा-री-रें,	poor.
खोल,	deep.		
धीट,	bold.	मातबर, श्रीमंत,	rich.
भित्रा, बुजट,	tim'id.	नम्र,	hum'ble.
मोठा-ठी-ठें,	large, big.	गर्विष्ठ,	proud.
रानटी,	wild.	मरणाधीन,	mor'tal.

* दोन किंवा अधिक विशेषणें असलीं तर उपपद पहिल्या विशेषणाच्या पूर्वी घालावें.

† पृ० २७, टीप * पहा.

‡ पृ० ७, टीप § पहा.

भाषांतरपाठ ९.

५३.—१. चांगलें मूल. २. धीट पुरुष. ३. खोल विहीर. ४. मातबर लोक. ५. मोठी पेटी. ६. मोठ्या पेट्या. ७. चांगलीं पुस्तकें. ८. उंच वृक्ष. ९. वाईट घरटीं. १०. चांगलें फळ. ११. मजबूत दरवाजे. १२. कडू फळें.* १३. चांगले धनी. १४. वाईट सडका. १५. चकचकीत तारे.

१. A *tall* boy. २. *Tall* boys. ३. A *holy* man. ४. The *strong* men. ५. *Strong* men. ६. A *weak* child. ७. *Weak* children. ८. The *fair* girl. ९. *Proud* men. १०. The *proud* men. ११. The *small* nest. १२. A *small* nest. १३. The *poor* women. १४. *Small* houses. १५. *Deep* wells. १६. *Small* birds. १७. The *bad* roads. १८. A *small* mouse. १९. The *small* mouse. २०. *Small* mice. २१. The *small* mice.

धडा १०.

To be ह्याचा वर्तमान काळ.

५४.	एकवचन.		अनेकवचन.
I am,	मी आहें.	We are,	आम्ही आहों.
Thou art,	तूं आहेस.	You are,	तुम्ही आहां.
He, she, it is,	तो, ती, तें आहे.	They are,	ते, त्या, तीं आहेत.

५५. *To be* ह्या क्रियापदाच्या पुढें बहुतकरून नाम, सर्वनाम, किंवा विशेषण असतें; जसें :—

* Fruit ह्याचें अनेकवचन बहुधा fruit असेंच होतें. निरनिराळ्या प्रकारचीं फळें विवक्षित असलीं तर मात्र fruits असें रूप होतें.

The lion is *a wild animal.*

सिंह हा एक वनपशु आहे.

I am *he.*

तो मी आहें.

Man is *mortal.*

मनुष्य मरणाधीन आहे.

५६. शब्दसंग्रह १०.

आंधळा-ळी-ळें,	blind.	गवई, गाणारीण,	a sing'er.
मुका-की-कें,	dumb.*	न्यायाधीश,	a judge(जज्).
बहिरा-री-रें,	deaf.	मांजर,	a cat.
म्हातारा-री-रें, }	old.	कापणें,	to cut. (स०)
जुना-नी-नें, }		ठार मारणें,	to kill. (स०)
तरुण, वयानें लहान,	young.	पशु,	beast.
कृपाळू,	kind.	गाढव,	an ass.
निष्ठुर,	cruel.	मेज,	a table.†
वेडा-डी-डें,	mad.	खुर्ची,	a chair.
मूर्ख, (वि०)	fool'ish.	शहाणा,	wise, (वाइज्).

भाषांतरपाठ १०.

५७.—१. Men *are* animals. २. Animals eat. ३. Cats eat mice. ४. The judge *is* a wise man. ५. The old man *is* kind. ६. You *are* kind. ७. He *is* foolish. ८. Good men love the truth. ९. You *are* dumb. १०. Thou *art* man. ११. We *are* bold. १२. You *are* proud. १३. It is bad. १४. The child *is* weak. १५. The young man *is* deaf. १६. The girl *is* timid. १७. The

* B च्या पूर्वी *m* असला तर *b* चा उच्चार होत नाहीं.

† शब्दाच्या शेवटल्या *le* चा चमत्कारिक उच्चार होतो, तो शिक्षकापासून शिकावा.

fruit *is* sweet. १८. He *is* a rich man. १९. She is cruel. २०. The poor girl *is* blind.

१. तो मनुष्य वेडा आहे. २. त्या स्त्रिया तरुण आहेत. ३. तें मांजर उंदीर पकडीत असतें. ४. गाढव हा एक पशु आहे. ५. घडे चांगले आहेत. ६. मुलगे धीट आहेत. ७. तुम्ही बळकट आहां. ८. तूं मातबर आहेस. ९. मी गरीब आहें. १०. मुली सुरेख आहेत. ११. तो वेडा मुलगा तीं कडू फळें खात असतो. १२. जहाजें मजबूत आहेत. १३. पवित्र माणसें* नम्र असतात. १४. तो मातबर मनुष्य गर्विष्ठ आहे. १५. तो चांगला गाणारा आहे. १६. ती चांगली गाणारीण आहे. १७. चाकू चांगला आहे. १८. सुऱ्या वाईट आहेत. १९. ते धीट पुरुष सिंहाला भितात. २०. त्या खुर्च्या मोठ्या आहेत.

धडा ११.

षष्ठी.

५८. प्रथमेच्या रूपाला *'s* (apos'trophe *s*) हा प्रत्यय† लाविला म्हणजे **षष्ठीचें** रूप होतें; जसें :—A bird, a bird'*s* **पक्ष्याचा-ची-चें; चे-च्या-चीं,** A fish, a fish'*s* **माशाचा इ०.**‡

---

* पुरुषजातीकडे किंवा स्त्रीजातीकडे लक्ष न देतां एखाद्या व्यक्तीविषयीं बोलावयाचें असल्यास person माणूस, मनुष्य हा शब्द योजावा.

† *S* ह्याच्या उच्चाराविषयीं पृष्ठ २३, कलम १३, टीप § पहा. आणखी असें लक्षांत ठेवावें कीं, नामांचें अंत्याक्षर *s*, *sh*, *ch*, *x*, किंवा *z* असलें तर s चा **एस्** असा उच्चार होतो.

‡ जुनाट इंग्रजींत षष्ठीचा प्रत्यय *es* असा होता, परंतु कालक्रमेंकरून *e* चा लोप होऊन त्याबद्दल ' ही खूण लिहिण्याचा क्रम सुरू झाला.

५९. ज्या नामाच्या अनेकवचनाच्या शेवटीं *s* नसतो, त्यांचीं अनेकवचनी षष्ठीचीं रूपें ह्याचप्रमाणें होतात; जसें :—

A man, Men'*s* **पुरुषांचा.**

A child, Children'*s* **मुलांचा.**

६०. परंतु नामाच्या अनेकवचनाच्या शेवटीं *s* असला तर पुढें नुसतें ' असें चिन्ह लिहावें, म्हणजे झालें; जसें :—

A dog, Dogs' **कुत्र्यांचा.**

६१. नामाच्या पूर्वीं एखादा षष्ठ्यंत शब्द असला तर त्या नामाला उपपदाची मुळींच गरज नाहीं;* जसें :—

The bird'*s* nest **पक्ष्याचें घरटें.**

६२. इंग्रजींत नामाच्या पूर्वीं *of* **चा-ची-चें** हें शब्दयोगी अव्यय† घालून षष्ठी साधण्याचा दुसरा एक प्रकार आहे; जसें :—

The bird's nest.

किंवा The nest *of* the bird.

६३. कोणत्याही **प्राण्या**विषयीं बोलावयाचें असल्यास मात्र *s* हा प्रत्यय योजावा;‡ परंतु *of* हें अव्यय पाहिजे तेथें चालतें. **पक्षी** सजीव असल्यामुळें The bird'*s* किंवा *of* the bird अशीं दोन्ही रूपें चालतात; परंतु **अंगरखा** निर्जीव वस्तु असल्यामुळें *of* the coat असेंच म्हटलें पाहिजे, the coat'*s* हें अशुद्ध होय.

---

* पृष्ठ २७, कलम २६ पहा.

† इंग्रजींत शब्दयोगी अव्ययें बहुतकरून नामाच्या किंवा सर्वनामाच्या पूर्वीं येतात.

‡ ह्या नियमाला अपवाद बरेच आहेत; जसें :—*To-days* news-paper **आजचें वर्तमानपत्र.**

६४. शब्दसंग्रह ११.*

राजा,	a mon'arch. / a king.	हात,	a hand.
		पाय,	a foot.
राणी,	a queen.	तोंड,	a mouth.
राजपुत्र, राजा,	a prince.	चेहरा, तोंड,	a face.
राजकन्या,	a prin'cess.	नाक,	a nose. (नोज्).
तक्ताधिपति राजा किंवा राणी,	sov'ereign.	कान,	an ear.
		गाल,	a cheek.
राजदंड,	a scep'tre.†	कोंपर,	an el'bow.
सिंहासन,	a throne.		
मुकुट,	a crown.	केंस,	a hair. (अने० hair).
बाग,	a garden.‡		
राजवाडा,	a pal'ace.	दांत,	a tooth. (अने० teeth).
झोंपडी,	a cot'tage.		
विद्यार्थी,	a pu'pil.	पान,	a leaf, (अने० leaves).
पंख,	a wing.	डोकें,	a head.
चोंच,	a beak.	कपाळ,	a fore'head.
शेंपटी,	a tail.	भुंवई,	an eye'brow.
शिंग,	a horn.	पापणी,	an eye'lid.
आयाळ,	a mane.	पापणीचा केंस,	an eye'lash.
जीभ,	a tongue.§	हनुवटी,	a chin.
हाताचें बोट,	a finger.	दाढी,	a beard.

* ह्या पुस्तकांत कांहीं शब्दसंग्रह सारख्या प्रकारचे व नेहमीं प्रचारांत येणारे शब्द एकत्र आणल्यामुळें मोठाले झाले आहेत. त्यांचे दोन दोन किंवा तीन तीन विभाग करून शिक्षकानें त्या त्या शब्दांवर नवीन वाक्यें रचावीं म्हणजे अधिक सोईचें होईल.

† पृ० २९, टीप † पहा. ‡ पृ० ३३, टीप * पहा.

§ शब्दाच्या अंतीं *gue* ह्या उच्चार ग् असा होतो.

पायाचें बोट,	a toe.	पंजा,	a paw.
नख,	a nail.	मिशा,	must'aches (ch=श्).
पोट,	a stom'ach. (ch=क्)	कल्ला,	a whis'ker.
ओंठ,	a lip.	खांदा,	a shoul'der.
छाती,	a breast.	गुडघा,	a knee.†
पाठ,	a back.	हाताचा अंगठा,	a thumb.‡
मनगट,	a wrist.*	उजवा-वी-वें,	a right.§
डोळा,	an eye (आय्).	डावा-वी-वें,	left.
मान,	a neck.	साप,	a ser'pent.

भाषांतरपाठ ११.

६५.—१. मुलाचें डोकें. २. म्हाताऱ्याची झोंपडी. ३. राजाचा मुकुट. ४. राजांचे मुकुट. ५. राणीचें सिंहासन. ६. राजकन्येचा बाग. ७. डोक्याचे केंस. ८. पशूंचीं नखें. ९. उंदरांच्या शेपट्या. १०. बैलांचीं शिंगें. ११. घराची भिंत. १२. घराच्या भिंती. १३. घरांच्या भिंती. १४. सिंहाची आयाळ. १५. त्या मुलाच्या उजव्या हाताचीं बोटें. १६. त्या मुलीचे डोळे. १७. खुर्चीची पाठ. १८. वृक्षाची कडू फळें. १९. मातबर लोकांचे चाकर. २०. मुलांच्या छत्र्या.

१. The door *of* a house. २. The door *of* the house. ३. A door *of* a house. ४. The door *of* the house. ५. The doors *of* the houses. ६. The doors *of* the house. ७. The doors *of* houses. ८. The leaves *of*

---

* पृ० २३, टीप ‡ पहा.
† पृ० २५, टीप † पहा.
‡ पृ० ३७, टीप * पहा.
§ पृ० २७, टीप * पहा.

the trees. ९. The leaves *of* trees. १०. The king's palace. ११. The palace *of* the king. १२. Birds' beaks. १३. Rich men's houses. १४. Poor men's cottages. १५. The poor men's small houses. १६. The blind man's dog. १७. The ass's ears. १८. The asses' ears. १९. Asses' ears. २०. The bird's wings. २१. The birds' wings. २२. Bird's wings. २३. The wings *of* the bird. २४. The wings *of* the birds. २५. The wings *of* birds.

धडा १२.

उपपदें (पुढें चालू).

६६. **विशेषनामाच्या** पूर्वी उपपद घालूं नये; जसें :—

Rama reads a book.

रामा पुस्तक वाचतो.

I know *Rama*.

मी रामाला ओळखतों.

६७. **भाववाचक** नामाला उपपद लागत नाहीं; परंतु त्या नामावरून ज्या गुणाचें ज्ञान होतें, त्याचे अनेक **प्रकार** कल्पिले किंवा त्याचा एकाद्या व्यक्तीशीं संबंध असला तर उपपद घातलें पाहिजे. उदाहरण, सद्गुणाविषयीं सामान्य रीतीनें बोलावयाचें असलें तर virtue असें म्हणावें; परंतु **परोपकार, सहनशीलता, प्रामाणिकपणा,** इत्यादि जे सद्गुणाचे निरनिराळे प्रकार आहेत, त्यांकडे किंवा एकाद्या मनुष्याच्या सद्गुणाकडे लक्ष दिलें तर *a* virtue किंवा *the* virtue असें म्हटलें पाहिजे. दुसरें उदाहरण :—

Colour is a property of flowers.

रंग (असणें) हा फुलांचा एक धर्म आहे.

Red is a colour.

तांबडा हा एक रंग आहे.

The colour of this flower is red.

ह्या फुलाचा रंग तांबडा आहे.

☞ भाववाचक नामाचा अशा रीतीनें उपयोग केला तर त्याचें **अनेकवचन** होऊं शकतें; जसें :—

Red, white and green are colours.

तांबडा, पांढरा व हिरवा हे रंग आहेत.

६८. तसेंच **सोनें, तेल, पाणी, गहूं वगैरे पदार्थांचीं** जीं नांवें त्यांना उपपद लागत नाहीं, असा साधारण नियम खरा, परंतु त्या पदार्थांच्या निरनिराळ्या प्रकारांची विवक्षा असली तर उपपदाची गरज असते व अनेकवचनही होऊं शकतें; जसें :—

Gold is a metal.

सोनें हा एक धातु आहे.

The Gold of Peru.

पेरु प्रांतांतलें सोनें.

Sugar **साखर.**

Sugars, **निरनिराळ्या प्रकारची साखर.**

६९. **शब्दसंग्रह १२.***

ईश्वर,	God.	रंग,	a colour.
आकाश,	the sky.	तुरट,	an astrin'gent.
धातु,	a metal.†	पांढरा-री-रें,	a white.
दऊत,	an ink'stand.	काळा-ळी-ळें,	a black.

* पृ० ४७, टीप * पहा.

† पृ० २९, टीप * पहा.

प्रामाणिकपणा,	hone'sty.*	हिरवा-वी-वें,	green.
सद्गुण,	vir'tue.	पिवळा-ळी-ळें,	yel'low.
दुर्गुण,	vice.	निळा-ळी-ळें,	blue.
बळ,	strength.	तांबडा-डी-डें,	red.
जीव,	life.	करडा-डी-डें,	grey.
मरण,	death.	जांभळा-ळी-ळें,	pur'ple.
वेळ,	time.	शेंदरी,	scar'let.
कठीण,	hard.	गुलाबी,	pink.
मऊ,	soft.	किरमिजी,	crim'son.
आंबट,	sour.	केशरी,	saf'fron.
खारट,	salt.	नारिंगी,	or'ange.
तिखट,	pun'gent.	पिंगट,	brown.

पदार्थांचीं नांवें.

अन्न,	food.	शाई,	ink.
भाकर,	bread.	मीठ,	salt.
पाणी,	wat'er.	साखर,	su'gar.
जमीन,	land.	खडीसाखर,	su'gar-can'dy.
दगडी कोळसे,	coal.	सरपण,	fire'wood. / fu'el.
दूध,	milk.		
लोणी,	but'ter.	इमारतीचें लांकूड,	tim'ber.
ताक,	but'termilk.	वाळू,	sand.
दहीं,	curds.	कमावलेलीं कातडीं,	lea'ther.
मलई, साय,	cream.		
तेल,	oil.	कागद,	pa'per.
दारू,	wine.	धान्य,	corn.

* *Heir, honest, honour, hour,* ह्या शब्दांत व त्यांपासून निघालेल्या साधित शब्दांत *h* चा उच्चार होत नाहीं.

मांस,	meat.	साबण,	soap.
मासळी,	fish.	पैका-से,	mon'ey.
बकऱ्याची सागुती,	mut'ton.*	दगड,	stone.
चहा,	tea.	कांच,	glass.
बुंद, कवा,	cof'fee.	गवत,	grass.
फळफळावळ,	fruit.	कापड,	cloth.
मध,	honey.	तागाचें कापड,	lin'en.
तांदूळ,	rice.	रेशीम,	silk.
भात,	boiled rice.	सोनें,	gold.
गहूं,	wheat.	रुपें,	sil'ver.
चणे,	gram.	पितळ,	brass.
हवा,	air.	तांबें,	cop'per.
कापूस,	cot'ton	लोखंड,	i'ron. (आयर्न)
रक्त,	blood.	कथील,	tin.
शिसें,	lead.	जस्त,	zinc.

भाषांतरपाठ १२.

७०.—१. *Hari* eats bread. २. The sky is blue. ३. The *strength* of the boy is great. ४. The boy is strong. ५. He is a strong boy. ६. *Honesty* is *a virtue*. ७. *God* is great. ८. *God* is good. ९. The flowers of the tree are white. १०. *Milk* is white. ११. The *milk* is bad. १२. The boy's coat is scarlet. १३. The old man's hair is grey. १४. *Cotton* is soft. १५. *Iron* is a hard metal. १६. *Stone* is hard. १७. We drink *water*. १८. We fear *death*. १९. *Gold* is yellow. २०. *Time* flies.

१. रुपें पांढरें असतें. २. पितळ पिंवळी असते.

---

* पृ० ३०, टीप * पहा.

३. तो शाई विकत घेतो. ४. आपण भात खातों. ५. कोळसे काळे असतात. ६. पक्ष्यांचे पंख मऊ असतात. ७. फुलें हिरवीं असतात. ८. तो दूध पितो. ९. तो कमावलेलीं कातडीं विकतो. १०. घोडा पांढरा आहे. ११. आकाश निरभ्र आहे. १२. तो मोठाले दगड फेंकतो. १३. ते दारू पितात. १४. पक्ष्यांच्या चोंची कठीण असतात. १५. बैलांचीं शिंगें कठीण असतात. १६. त्या स्त्रीचे केंस* काळे आहेत. १७. मुलांचे दांत लहान असतात. १८. फळ आंबट आहे. १९. झाडांचीं पानें हिरवीं असतात. २०. गवत हिरवें असतें.

धडा १३.

पुरुषवाचक व दर्शक सर्वनामें.

७१. इंग्रजींत I **मी,** thou **तूं,** he, she, it **तो, ती, तें** ह्यांस **पुरुषवाचक,** आणि this **हा, ही, हें,** that **तो, ती, तें,** such **असा, असला,** so **असा,** yonder **पलीकडचा,** the same **तोच** ह्यांस **दर्शक सर्वनामें** म्हणतात.

७२. This व that ह्यांचीं अनेकवचनें यथाक्रमें these (**दीज्**) व those (**दोज्**) अशीं होतात. Such, So व Yonder ह्यांचीं अनेकवचनें एकवचनासारखींच होतात; जसें :—

These men **हे मनुष्य.** *Such* men **असे मनुष्य.**

---

* डोक्याच्या किंवा अंगाच्या केंसाला hair हा एकवचनान्त शब्द लावतात; परंतु वेगवेगळ्या केंसाकडे लक्ष दिलें तर hairs असें अनेकवचन होऊं शकतें.

७३. **तो, ती, तें** हें मराठींत जेव्हां पुरुषवाचक सर्वनाम* असतें तेव्हां he, she, it व दर्शक सर्वनाम असतें तेव्हां that हा शब्द योजावा; जसें :—

He runs, **ते** — किंवा your
their किंवा
That their **मनुष्य धांवतो.**

७४. The ह्या ... that ... अर्थ **तो, ती, तें** असा सांगितला, परंतु मराठींत उपपदांची गरज नसल्यामुळें the वर जोर असला तर किंवा तो शब्द सोडल्यानें मराठींत स्पष्ट अर्थ होत नसला तर मात्र त्याचें मराठींत भाषांतर करावें;† जसें :—

This is *the*‡ man.

तोच हा§ मनुष्य.

I fear *the* man.

मी त्या मनुष्याला भितों.

The child is weak.

मूल अशक्त आहे.

☞ The ह्या उपपदास अलीकडे दर्शक सर्वनामांत घालतात.

७५. Such ह्या दर्शक सर्वनामापुढें नाम एकवचनान्त असलें व उपपदाची अपेक्षा असली तर an किंवा a हें उपपद मध्यें येतें; जसें :—

Such *a* man, **असा मनुष्य, असला मनुष्य.**

Such men, **असे मनुष्य, असले मनुष्य.**

---

* दादोबाकृत महाराष्ट्र-व्याकरण—'पुरुषवाचक सर्वनाम' पहा.

† पृ० २८, कलम ३१ पहा.

‡ वाचतांना the वर जोर देऊन वाचावें.

§ कधीं कधीं is ह्या क्रियापदाचें मराठींत भाषांतर केलें नाहीं तरी चालतें.

७६. So हें मुख्यत्वेंकरून क्रियाविशेषण असतें; परंतु कधीं कधीं त्याचा दर्शक सर्वनामासारखा प्रयोग होतो. असें [illegible] च्या कर्माच्या व क्वचित् उद्देश्याच्या स्थानीं अस[illegible]लीं कातडीं विक[illegible].

[illegible] निरभ्र आहे. [illegible]

[illegible] भितात. [illegible]

It is *so*, **असें आहे.**

यांतील पहिल्या वाक्यांत so हें कर्म आहे आणि दुसऱ्यांत is या क्रियापदाच्या पुढला प्रथमान्त शब्द आहे असें समजावें.

७७. Same ह्या सर्वनामाच्या पूर्वीं बहुतकरून the, this, किंवा that हा शब्द असतो व दोहोंचा मिळून अर्थ **हा** किंवा **हाच**, **तो** किंवा **तोच**, **सदरहू** अशा प्रकारचा होतो; जसें :—

This is *the same* tree.

तोच हा वृक्ष.

This same man is a thief.

हाच (किंवा सदरहू) मनुष्य चोर आहे.

The nobles fear *that same* Henry.

त्याच हेन्रीला सरदार लोक भितात.

७८. I, thou, he, she, it ह्या सर्वनामांचीं द्वितीयेचीं व षष्ठीचीं रूपें यथानुक्रमें पुढें दिलीं आहेत.

एकवचन.

द्वितीया.		षष्ठी.	
me,	मला.	my किंवा mine,	माझा-झी-झें.
thee,	तुला.	thy किंवा thine,	तुझा.
him,	त्याला.	his (हिज्)	त्याचा.
her,	तिला.	her किंवा hers,	तिचा.
it,	त्याला.	its,	त्याचा.

अनेकवचन.

द्वितीया		षष्ठी.	
us,	आम्हांला.	our किंवा ours,	आमचा.
you,	तुम्हांला.	your किंवा yours,	तुमचा.
them,	त्यांना.	their किंवा theirs,	त्यांचा.
them,	त्यांना.	their किंवा theirs,	त्यांचा.

This (अने० these), that (अने० those), such, so, yonder, the same, ह्या दर्शक सर्वनामांचा विशेषणांसारखा प्रयोग होतो, म्हणून त्यांचीं रूपें प्रथमेसारखींच राहतात.

७९. My, mine, thy, thine, वगैरे जीं षष्ठीचीं दोन दोन रूपें सांगितलीं, त्यांपैकीं पहिलीं रूपें **नामांच्या** पूर्वीं योजावीं व षष्ठीचा **क्रियापदाशीं** जर विशेष संबंध असला तर दुसरीं रूपें योजावीं; जसें :—

This is *my* book.

हें माझें पुस्तक आहे.

This book is *mine*.

हें पुस्तक माझें आहे.

८०. इंग्रजी वाक्यांत my, thy वगैरे जीं षष्ठ्यंत सर्वनामांकडून जर उद्देश्याचा बोध होत असला, तर त्यांच्या जागीं मराठींत **आपला-ली-लें-ले-ल्या-लीं** ह्या शब्द घालावा; जसें :—

He shuts *his* shop.

तो आपलें दुकान बंद करितो.

८१. शब्दसंग्रह १३.

आई,	a moth'er (मदर).	आईबाप,	par'ents.
बाप,	a fa'ther.	बहीण,	a sis'ter.

भाऊ, a bro'ther.
नवरा, a hus'band.
मुलगा, a son.
मुलगी, a daugh'ter.
पुतण्या, a neph'ew.*
पुतणी, a niece.
चुलतभाऊ-बहीण, a cou'sin.†
चुलता, काका, a pater'nal uncle.
मामा, a mater'nal uncle.
आत्या, a pater'nal aunt.
मावशी, a mater'nal aunt.
मावसा, the husband of a mater'nal ancle.
चुलती, काकी, the wife of a pater'nal uncle.
पोरका-की, an or'phan.

सासरा, a fa'ther-in-law.‡
सासू, a moth'er-in-law.
जांवई, a son-in-law.
सून, a daugh'ter-in-law.
दीर, मेहुणा, a broth'er-in-law.
नणंद, a husband's sister.§
मेहुणी, a wife's sister.§
भावजय, a brother's wife.§
जाऊ, a husband's brother's wife.
आजा, a grand'father.¶
आजी, a grand'mother.
नातू, a grand'son.
नात, a grand'daughter.
सावत्रभाऊ, a half-broth'er.
सावत्रबहीण, a half-sis'ter.

भाषांतरपाठ १३.

८२.—१. माझी बहीण त्याची बायको. २. तो माझा मेहुणा. ३. मी त्याचा मेहुणा. ४. माझ्या बापाचा तो जांवई. ५. माझा बाप त्याचा सासरा. ६. माझी आई त्याची सासू. ७. माझी बायको माझ्या आईबापांची सून. ८. माझ्या बायकोचा भाऊ माझा मेहुणा. ९. माझी

* ह्या शब्दांतल्या *ph* चा उच्चार *v* सारखा होतो.

† ह्या शब्दाचा उच्चार शिक्षकापासून शिकावा. **मावसभाऊ** व **मावसबहीण** ह्यांना हा शब्द लावतात.

‡ अनेकवचन fathers-in-law.

§ Sister-in-law ह्या शब्दाचे हे तिन्ही अर्थ होतात.

¶ A great-grand-father **पणजा.**

बहीण माझ्या बायकोची नणंद. १०. माझ्या बायकोची बहीण माझी मेहुणी. ११. त्या मुलीच्या नवऱ्याचे भाऊ तिचे दीर. १२. तिच्या नवऱ्याच्या बहिणी त्या तिच्या नणंदा. १३. तो आंधळा मुलगा पोरका आहे. १४. ह्या मुली माझ्या चुलतबहिणी आहेत.

१. *These* girls are sisters. २. *They* are that man's daughters. ३. *This* boy is their brother. ४. *Their* father is a rich man. ५. *Those* boys are *my* pupils. ६. *They* are cousins. ७. Butter is white. ८. *So* is milk. ९. Grass is green. १०. *So* are the leaves of trees. ११. *Such* men are proud. १२. *Such* fruits are sour. १३. I know *that* old man. १४. *He* is *your* grandfather. १५. *That* young woman is *my* maternal aunt. १६. *This* pen-knife is *yours*. १७. *This* is *your* pen-knife. १८. *This* garden is *ours*. १९. *They* know *you*. २०. *The* bad man frightens *me*. २१. *His* master beats *him*. २२. *The* master beats *his* pupils. २३. *Your* uncle calls *you*. २४. *He* teaches *his* nephew. २५. God sees *us*.

धडा १४.

It.

८३. इंग्रजींत to be ह्या क्रियापदाचें उद्देश्य त्याच्यापुढें ठेवून उद्देश्याच्या जागीं it हें सर्वनाम घालण्याची फार वहिवाट आहे. असें असलें तर it ह्या शब्दाचें भाषांतर करूं नये, व पुढल्या नामाच्या किंवा सर्वनामाच्या पुरुषलिंगवचनांच्या अनुरोधानें is ह्याचें भाषांतर करावें.—

It is I **मी** (किंवा **मीच**) **आहें.**

It is a girl, **मुलगी आहे.**

It is we, **आम्ही** (किंवा **आम्हीच**) **आहों.**

८४. नर किंवा मादी ह्याकडे लक्ष न देतां साधारण रीतीनें एकाद्या पशूविषयीं बोलावयाचें असल्यास it हें सर्वनाम योजावें; जसें :—

The conductor of the elephant sits on *its* neck.

महात हत्तीच्या मानेवर बसतो.

८५. **शब्दसंग्रह १४.**

हत्ती,	an el'ephant.	सांबर,	an elk.
उंट,	a cam'el.*	गवा,	a bi'son.
वाघ,	a ti'ger.	मेंढरूं,	a sheep (अने० sheep).
रेडा, म्हैस,	a buf'falo.		
खोंकड,	a fox.	बकरें,	a goat.
हरीण,	a deer. (अने० deer).	कोंकरूं,	a lamb.†
काळवीट,	a black an'telope.	ससा,	a hare.
नीलगाय,	a white-foot'ed antelope.	वानर,	a mon'key.
		आरवणें,	to crow. (अ०)
कोंबडा,	a cock.	बाळगणें, पाळणें, राखणें,	to keep. (अ०)
कोंबडी,	a hen.		
विंचू,	a scor'pion.	लांब,	long.
कोंबडीचें पिलूं,	a chick'en.	आंखूड,	short.
		बारीक,	slen'der.

---

* ह्यांतील *el* चा उच्चार शिक्षकापासून शिकावा.

† पृ० ३७, टीप * पहा.

डुकर,	a hog, swine. (अने० swine.)	बारीक, पातळ,	thin.
खार,	a squir'rel.*	जाड, दाट,	thick.
किडा,	a worm.	अंडें,	an egg.
अस्वल,	a bear.	कांहीं,	some.
आणि,	and.	पुष्कळ, (संख्या)	many.
चपळ,	act'ive, nimble.		

भाषांतरपाठ १४.

८६.—१. *It* is a lion. २. He is the king of beasts. ३. *It* is my dog. ४. That dog is mine. ५. *It* is a deep well. ६. Some men are tall. ७. That umbrella is yours. ८. *It* is your umbrella. ९. *It* is a bad road. १०. These pens are yours. ११. *It* is our lamb. १२. Those hens are ours. १३. *It* is his coat. १४. *It* is my chair. १५. He is our maternal uncle. १६. *It* is a small bird. १७. They are wolves. १८. That is our house. १९. Many persons keep hens. २०. The cock crows. २१. I am he.

१. कांहीं लोक कोंबड्यांचीं अंडीं खातात. २. ससा हें एक रानटी जनावर आहे. ३. तें भितरें आहे. ४. विंचू किडे खातात. ५. कांहीं विंचू मोठे व काळे असतात. ६. उंट हें मोठें जनावर असतें. ७. त्याचें डोकें लहान असतें. ८. त्याची मान बारीक व लांब असते. ९. खार हें चपळ जनावर आहे. १०. सशाचे केंस मऊ असतात. ११. तो आपल्या गाईला मारतो. १२. ती त्याची गाय आहे. १३. ती गणपतरावाची मुलगी आहे. १४. हें मूल गाईचें दूध पीत असतें. १५. हा चांगला कापूस आहे.

* पृ० ३७, टीप i. ह्यांत सांगितलेला उच्चार *ol* ह्याचाही क्वचित् होतो.

१६. पक्षी आपलीं घरटीं बांधतात. १७. हीं आमचीं पुस्तकें आहेत. १८. तीं मेंढरें त्यांचीं आहेत. १९. तो माझ्या मुलांना शिकवितो. २०. ही नीलगाय आहे.

धडा १५.

वर्तमानकालवाचक धातुसाधितें.

८७. क्रियापदाला *ing* हा प्रत्यय लावला म्हणजे त्याचें **वर्तमानकालवाचक धातुसाधित** सिद्ध होतें; जसें :—
To do **करणें**, do*ing* **करीत.**

८८. क्रियापदाचा उपांत्य वर्ण व्यंजन व अंत्य वर्ण *e* हा असला तर, *ing* हा प्रत्यय लावतांना *e* चा लोप होतो; जसें :—To writ*e* **लिहिणें**, writ*ing* **लिहीत.**

अपवाद—To singe **होरपळणें**, To tinge **छटा देणें.**

८९. क्रियापदाच्या अंतीं *ie* हे वर्ण असले तर त्यांच्या जागीं *y* हा वर्ण घालावा; जसें :—To d*ie* **मरणें**, d*y*ing **मरत.**

९०. कलमें ६ व ७ ह्यांत सांगितलेले नियम *ing* हा प्रत्यय लावतांना लागू पडतात; जसें :—To *run* **धांवणें**, run*n*ing; to perm*it* **परवानगी देणें**, permit*t*ing.

९१. शब्दसंग्रह १५.

जाळणें, जळणें, चटका बसणें,	to burn. (स० व अ०)	रंगविणें, डूब देणें,	to dye. (स०)
		घालणें, ठेवणें,	to put. (स०)
भाजणें, (स०)	to bake. (स०)	स्थापणें, ठेवणें,	to place*(स०)
	to roast. (स०) [10]	हलणें, सरणें, हलविणें,	to move. (अ०) (स० व अ०) [11]

---

* एकाद्या नियमित जागीं नेहमीं एकादी जिन्नस ठेवणें ह्या अर्थी to keep हें क्रियापद योजावें व एरवीं एकाद्या ठिकाणीं एकादी जिन्नस कांहीं वेळ ठेवणें ह्या अर्थी to place हें योजावें. आंत घालणें ह्या अर्थी to put हें योजावें. एकादें जनावर बाळगणें = to keep.

तळणें,	to fry. (स०)	भटकणें, हिंडणें,	to roam. (अ०) to wan'der(अ०)
निखाऱ्यावर भाजणें,	to roast.(स०)		
उकळणें, कढविणें,	to boil.	मिसळणें,	to mix. (स०)
उकडणें, शिजविणें, शिजणें,	to boil. (स० व अ०)	ढकलणें, लोटणें,	to push.
		बांधणें,	to tie.
पोळणें,	to scald.	स्वयंपाक करणें, रांधणें,	to cook. (स० व अ०)
चाटणें,	to lick.		

भाषांतरपाठ १५.

१. तो आम्हांला बोलावतो. २. तो निष्ठुर पुरुष मला मारीत असतो. ३. मी त्याला पाठवीत असतों. ४. ही स्त्री आपल्या (स्वतःच्या) मुलींना शिकवीत असते. ५. तूं आपल्या चाकराला पाठवीत असतोस. ६. ही लेखणी तिची आहे. ७. त्या पाट्या तुमच्या आहेत. ८. त्या तुमच्या पाट्या आहेत. ९. तोच हा मुलगा. १०. तो मुलगा असलीं फळें खातो.

९२. मागील सर्व कोशांतील इंग्रजी क्रियापदांचीं वर्तमानकाळवाचक धातुसाधितें भाषांतरासहित सांगा.

धडा १६.

अपूर्ण वर्तमान काळ.

९३. एकाद्या क्रियापदाच्या वर्तमानकाळवाचक धातुसाधिताच्या पूर्वी to be ह्याच्या वर्तमान काळाचीं रूपें ठेविलीं म्हणजे त्या क्रियापदाचा अपूर्ण वर्तमान सिद्ध होतो; जसें :—

To write.

एकवचन.	अनेकवचन.
१. I am writing.	We are writing.
२. Thou art writing.	You are writing.
३. He, She, it is writing.	They are writing.

९४. शब्दसंग्रह १६.

अभ्यास करणें, to study.

ओढणें,	to pull. (स०)	मूळाक्षरें,	the al'phabet.
धुणें,	to wash. (स०)	अपराध,	a fault.
विचार करणें,	to think.(स० व अ०)	बोलणें,	to speak. (स० व अ०)
(उसनें देणें), व्याजू देणें,	to lend. (स०)	गुन्हा,	a crime.
उसनें घेणें,	to bor'row. (स०)	निरोगी,	healthy.
भांडणें,	to quar'rel.	आजारी,वाईट,	ill.
पत्र, अक्षर,	a let'ter.	आजारी, वीट आलेला,	sick.

भाषांतरपाठ १६.

९५.—१. तो खरें बोलत आहे. २. तो खरें बोलतो. ३. तो खरें बोलत असतो. ४. माझा भाऊ पैसे व्याजू देत असतो. ५. तें लहान मांजर त्या मोठ्या उंदराला पकडीत आहे. ६. विद्यार्थी आपलीं पुस्तकें वाचीत आहेत. ७. तो निर्दय मुलगा त्या बिचाऱ्या आंधळ्याला ओढीत आहे. ८. ती विचार करीत आहे. ९. मूल रडत आहे. १०. त्याचा अपराध मोठा आहे. ११. कांहीं पोरें त्या म्हाताऱ्याच्या गाढवाला मारीत आहेत. १२. मी पत्र लिहीत आहें. १३. तें चांगलें दुकान आहे. १४. पक्षी आपलीं घरटीं बांधीत आहेत. १५. तुमचे विद्यार्थी आपल्या स्लेटी धूत आहेत. १६. पंतोजी मुलांना शिकवीत आहेत. १७. ते धांवत आहेत. १८. पुष्कळ लोक फळफळावळ विकत घेत आहेत. १९. तो दूध पीत आहे. २०. मी आपल्या चाकराला पाठवीत आहें.

१. The young man *is writing* a long letter २. I *am coming.* ३. You *are playing.* ४. He *is studying* the alphabet. ५. The girl *is buying* sugar. ६. They *are swimming.* ७. The dogs *are barking.* ८. The cruel man *is beating* the poor ox. ९. The good boys *are learning* their lesson. १०. The bad boys *are throwing* stones. ११. Those men *are building* a house. १२. His mother is ill.* १३. He is a healthy boy. १४. You *are hiding* your fault. १५. Our cat *is dying.* १६. He *is dyeing* leather. १७. The sky is fair. १८. The sun *is shining.* १९. The birds *are singing.*† २०. The boys *are playing.*

धडा १७.

To have ह्याचा वर्तमान काळ.

९६. To have ह्या क्रियापदाचा अर्थ **धनीपणा बाळगणें, जवळ असणें,** अशा प्रकारचा होतो. त्याचीं वर्तमान काळाचीं रूपें खालीं दिलीं आहेत.—

एकवचन.	अनेकवचन.
१. I have.	We have.
२. Thou hast.	You have.
३. He, she, it has.	They have.

---

* आजारी ह्या अर्थी बहुतकरून ill हा शब्द योजावा. पुढें नाम असलें तर मात्र sick हा शब्द योजावा. नाम असलें तर sick ह्याच्यापुढें of हें शब्दयोगी अव्यय घालावें. उदाहरणें:—

I am *ill*, मी आजारी आहें.
A *sick* man, आजारी मनुष्य.
He is *sick of* fever, त्याला ताप आला आहे.
I am *sick of* this work, मला ह्या कामाचा वीट आला आहे.

† मधुर शब्द करीत आहेत.

ह्या क्रियापदाचें भाषांतर करण्याचा प्रकार पुढील उदाहरणांवरून सहज लक्षांत येईल.—

He *has* a pen.

त्याच्याजवळ लेखणी आहे.

You *have* an inkstand.

तुजजवळ दउत आहे.

९७. कधीं कधीं **जवळ आहे** ह्या शब्दांनीं निर्वाह होत नाहीं, अशा ठिकाणीं इंग्रजींतील उद्देश्य मराठींत चतुर्थ्यंत करून, आहे हें क्रियापद घालावें; जसें :—

He *has* three sons.

त्याला तीन मुलगे आहेत.

९८. **नेहमीं** जवळ असणाऱ्या वस्तूचा बोध होत असला तर **आहे** ह्याबद्दल **असतो** हें क्रियापद घालावें; जसें :—

Birds *have* wings.

पक्ष्यांना पंख असतात.

९९. कधीं कधीं तर **जवळ** हा शब्द गाळून षष्ठीच ठेवावी लागते; जसें :—

You *have* clean hands.

तुझे हात स्वच्छ आहेत.

१००. **शब्दसंग्रह १७.**

शहर,	a cit'y, a town.*	कुलूप,	a lock.‡
खेडेगांव,	a vil'lage.†	किल्ली,	a key.

* Town हें प्राय: city पेक्षां लहान किंवा कमी महत्त्वाचें असतें.

† शब्दाच्या शेवटच्या *age* चा एज् असा उच्चार होतो.

‡ कडींत अडकविण्याच्या सुट्या कुलुपाला a pad'lock म्हणतात.

नदी,	a riv'er.	घड्याळ,	a clock.
तळें,	a lake.	खिशांतलें घड्याळ,	a watch.
समुद्र,	a sea.	तंगडी, पाय,	a leg.†
महासागर,	an o'cean (ओशन्).	दांडा, मूठ,	a han'dle.‡
बेट,	an isl'and.	जुगदान,	a satch'el.
मित्र,	a friend.	भितरा, रणभीरु,	a cow'ard.
वास,	smell.	घाणेरडा-डी-डें,	dirt'y.
रुची, चव,	taste.	तीक्ष्ण,	sharp.
आंखणी,	a rule'r.	बोथट,	blunt.
उंच,	high.*	छानदार, खासा,	fine.
उंची,	height.*	शूर,	brave.
रुंद,	broad.	टोपी,	a hat.
रुंदी,	breadth.	सुवासिक,	fra'grant.
खोली,	depth.	स्वच्छ,	clean.

भाषांतरपाठ १७.

१०१.—१. I *have* a ruler. २. You *have* many friends. ३. He *has* a fragrant flower. ४. He has a satchel. ५. I *have* a watch. ६. The old man has a daughter. ७. The camel *has* a long neck. ८. Asses *have* long ears. ९. The city *has* strong walls. १०. The table *has* legs. ११. A river *has* banks. १२. Sea-water is

---

* पृ० २७, टीप * पहा.

† Leg म्हणजे गुडघ्यापासून घोट्यापर्यंत जो पायाचा भाग तो; परंतु कधीं कधीं हा शब्द मांडीपासून पायाच्या तळव्यापर्यंत सगळ्या पायालाही लावतात. Foot म्हणजे घोट्यापासून खालचा पाय, मांडीला the thigh, पोटरीला the calf of the leg व घोट्याला the ankle असें म्हणतात. The lap=बसलेल्या मनुष्याची मांडी.

‡ हाताच्या मुठीला the fist म्हणतात; मूठभर ह्याला a handful of—असें म्हणतात.

salt. १३. The ocean is deep. १४. The box *has* a lock. १५. This white flower *has* a sweet smell. १६. He has a sister. १७. They *have* brave sons. १८. This man's son is a coward. १९. That boy *has* dirty hands. २०. The tree *has* many flowers. २१. He *has* a high forehead. २२. The serpent *has* a tongue. २३. You *have* a sharp pen-knife. २४. Panvel is a village. २५. The old man *has* a long and white beard. २६. A cow *has* horns.

१. मजजवळ कांहीं पेन्सिली आहेत. २. तुझ्यापाशीं एक सुरी आहे. ३. त्याचे डोळे ल्हान आहेत. ४. त्याचा घाणेरडा अंगरखा आहे. ५. फुलांचा चांगला वास आहे. ६. त्याची एक गाय आहे. ७. मांजराला तीक्ष्ण नखें असतात. ८. त्याचे स्वच्छ दांत आहेत. ९. झाडांना पानें असतात. १०. त्याचा बाप शूर आहे. ११. कांहीं तळीं खोल असतात. १२. हत्तीचे कान मोठे असतात. १३. समुद्राला किनारा असतो. १४. त्याचें मोठें तोंड आहे. १५. तिला एक मुलगा आहे. १६. त्याचा एक घोडा आहे. १७. त्याचें मोठें घर आहे. १८. त्या घराला पुष्कळ दरवाजे आहेत. १९. त्याच्या ल्हान खिडक्या आहेत. २०. त्याच्या भिंती रुंद आहेत. २१. जुन्या घराच्या भिंती रुंद असतात. २२. माझे पुष्कळ मित्र आहेत. २३. माझे पुष्कळ चाकर आहेत. २४. कांहीं घरांच्या भिंती उंच असतात. २५. कांहीं झाडांना पुष्कळ पानें असतात. २६. त्याच्यापाशीं एक घड्याळ आहे. २७. मजजवळ एक छत्री आहे. २८. त्याची ल्हान झोंपडी आहे. २९. खुर्चीला पाय असतात. ३०. त्या कुलुपाची किल्ली तुजजवळ आहे.

धडा १८.

To have ह्याचा भूत काळ.

१०२.	एकवचन.	अनेकवचन.
१.	I had.	We had.
२.	Thou hadst.	You had.
३.	He, she, it had.	They had.

१०३. शब्दसंग्रह १८.

मालक,	an own'er.	एक,	one. (वन्).
शेत,	a field.	दोन,	two.
कुटुंब,	a family.	तीन,	three.
नातलग, आप्त,	{ a rela'tive.	चार,	four.
	a relation.*	पांच,	five.
संख्या,	a number.	सहा,	six.
छत, तक्तपोशी,	a ceiling.	सात,	seven.
घरांतली जमीन,	a floor.	आठ,	eight.
खोली,	{ a room.†	नऊ,	nine.
	an apart'ment.	दहा,	ten.
तळघर,	a cel'lar.	सुंदर,	beau'tiful.
माजघर,	{ the cen'tral	देखणा-णी-णें,	hand'some.‡
	apartment.	कुरूप,	ug'ly.
स्वैंपाकघर,	a kitch'en.	कावेबाज,कावा,	cun'ning.

* शब्दाच्या शेवटल्या tion किंवा sion ह्याचा बहुतकरून शन् असा उच्चार होतो.

† Room ह्या शब्दाचा अर्थ जागा असाही होतो.

‡ Han*d*some, han*d*kerchief व We*d*nesday ह्या शब्दांतल्या *d* चा उच्चार होत नाहीं.

बिछाना,	a bed.	धूर्त, चतुर,	shrewd.
निजावयाची खोली,	a bed'room.	विश्वासू,	faithful.
पलंग,	a bed'stead.	नवा-वी-वें,	new.
दिवाणखाना,	a draw'ing-room.	दिवा,	a lamp.
कोच, (बसावयाची),	a so'fa.	पाळणा,	a cra'dle.
आरसा,	a mir'ror. / a look'ing-glass.	फडताळ, कपाट,	a cup'board. (कबई).

भाषांतरपाठ १८.

१०४.—१. माझ्या मित्राला चार मुलें होतीं. २. त्याच्या जुन्या घराला एक स्वैंपाकघर, एक माजघर व तीन खोल्या होत्या. ३. त्याच्याजवळ तुझीं पुस्तकें आहेत. ४. त्याचें एक शेत होतें. ५. त्या फुलांचा चांगला वास होता. ६. तिला तीन मुली होत्या. ७. त्या मातबर मनुष्याचा एक सुंदर बाग होता. ८. माझ्या पांच छानदार बंड्या होत्या. ९. त्याचे पुष्कळ भाऊबंद होते. १०. माझा एक विश्वासू कुत्रा होता. ११. आमच्या सहा कोची होत्या. १२. तुझ्यापाशीं एक ल्हानसा आरसा होता. १३. त्याचें मोठें घर होतें. १४. त्याचें घर मोठें होतें. १५. त्याला सात दरवाजे व सहा खिडक्या होत्या. १६. त्या वाघाचे मोठे डोळे होते. १७. तुझ्या घराला मोठें तळघर होतें. १८. घोड्याला आयाळ असते.

१. You *had* many relatives. २. He *had* a large family. ३. The lion has a beautiful mane. ४. The fox is a cunning animal. ५. She is a shrewd woman. ६. He *had* my book. ७. We *had* faithful servants. ८. My house *had* many rooms. ९. We *had* four large

looking-glasses. १०. Your old house *had* a cellar. ११. A room has a floor, four walls, and a ceiling. १२. We have two sofas, a table, and some chairs. १३. My uncle's house has a large drawing-room. १४. Rich men's houses have large rooms. १५. Your bed-room is small. १६. His parents have five children—four sons and a daughter. १७. I know the owner of that house. १८. We *had* a beautiful lamp.

धडा १९.

To be ह्याचा भूत काळ.

१०५.	**एकवचन.**	**अनेकवचन.**
१.	I was.	We were.
२.	Thou wast.	You were.
३.	He, she, it was.	They were.

१०६. शब्दसंग्रह १९.

उद्योगी, मेहनती,	indus'trious.*	गुलाबी,	ro'sy. (रोझि).
आळशी, सुस्त,	lazy.	फिकट,	pale.
कामांत (गुंतलेला), खटपटी,	bus'y. (बिझि).	खरा-री-रें,	true.
		खोटा-टी-टें,	false.
निरुद्योगी, रिकामा,	idle.	स्वस्त, सवंग,	cheap.
सावध, हुशार,	care'ful.	महाग,	dear.
निष्काळजी,	care'less.	पिकलेला-ली-लें,	ripe.
सावधान, एकचित्त,	atten'tive.	कच्चा, हिरवा,	raw.
असावध, दुर्लक्ष,	inatten'tive.	अरुंद,	nar'row.
अमर,	immort'al.	रागीट,	pas'sionate.
शहाणा, हुशार,	clev'er.	रागावलेला,	an'gry.

---

* शब्दाच्या अंतीं ous ह्याचा उच्चार अस् असा होतो.

भाषांतरपाठ १९.

१०७.—१. Your old master *was* a passionate man. २. Corn *was* cheap. ३. The streets *were* narrow and dirty. ४. The young man is industrious. ५. The fruit *was* ripe. ६. He *was* idle. ७. His cheeks *were* pale. ८. You *were* busy. ९. It *was* a beautiful garden. १०. They *were* small trees. ११. He is a careless boy. १२. The child had rosy cheeks. १३. You *were* careful. १४. They *were* attentive. १५. Some persons are lazy. १६. Some metals are clear.

१. त्याचे मुलगे शूर होते. २. त्याच्या मुली सुंदर होत्या. ३. फळें कडू होतीं.* ४. मी कामांत आहें. ५. ते धीट होते. ६. कांहीं फळें कच्चीं होतीं.† ७. तूं रागावला होतास. ८. तो निरोगी होता. ९. त्याचे आईबाप गरीब होते. १०. कापूस चांगला होता. ११. तें लहान घर होतें. १२. तें घर लहान होतें. १३. तो पुरुष उंच होता. १४. तो खोटा मित्र होता. १५. त्याची बायको आजारी होती. १६. मी वाट दाखवीत आहें. १७. वाघ गाईला ठार मारीत आहे. १८. कागद जाड आहे. १९. चोर येत आहेत. २०. मी ह्या जहाजाचा मालक आहें.

धडा २०.

अपूर्ण भूत काळ.

१०८. एकाद्या क्रियापदाच्या वर्तमानकाळवाचक धातु-

---

* The fruit was bitter किंवा the fruits were bitter. पृष्ठ ३६, टीप * पहा.

† Some of the fruit was raw किंवा the fruits were raw पृष्ठ ३६, टीप * पहा.

साधिताच्या पूर्वीं to be ह्याच्या भूतकाळाचीं रूपें ठेविलीं म्हणजे त्या क्रियापदाचा **अपूर्ण भूत काळ** होतो; जसें :—

To write.

एकवचन.	**अनेकवचन.**
१. I was writing.	We were writing.
२. Thou wast writing.	You were writing.
३. He, she, it was writing.	They were writing.

१०९. शब्दसंग्रह २०.

(कोयत्यानें) कापणें,	to mow.(स०)	शिवणें,	to sew (स०)
पेरणें,	to sow.	घडी करणें, बांधणें,	to fold.(स०)
बनविणें, घडणें, करणें,	to make.(स०)	झाडणें, केर काढणें,	to sweep.(स०)
गालिचा,	a carpet.	करवत,	a saw.
नांगरणें,	to plough.* (स०)	करवतीनें कापणें,	to saw. (स०)
तासणें, हजामत करणें,	to shave.(स०)	सुतार,	a car'penter.
शिंपी,	tai'lor.†	माळी,	a gar'dener. (गार्डनर).
शेतकरी,	a hus'bandman. (अने० men).	पागोटें,	a tur'ban.
न्हावी,	a barber.	पगडबंद,	a turban-folder
कांतणें, सूत काढणें,	to spin. (स०)	झाडूवाला, भंगी,	a sweep'er
तोडणें, खुडणें,	to pluck. (स०)	धोबी, परीट,	a wash'erman
(लोंकर इ०) पिंजणें,	to card.(स०)	परटीण,	a wash'erwoman
विणणें,	to weave. (स०)	मोलकरीण,	a maid, a maid servant.
कपडे,	clothes.‡ (क्लोद्‌ज्).	कोष्टी,	a weav'er.
		गवळी,	a milk-man

* ह्या शब्दांतल्या *gh* चा उच्चार होत नाहीं.

† पृ० २९, टीप † पहा.

‡ Cloths कापडें, Clothes कपडे

बीं,	a seed.	गवळण,	a milk'maid. a milk'woman.	
बोळ, गल्ली, आळी,	a lane, an al'ley	वास घेणें, चव घेणें,	to smell. to taste.	(स०) (स०)

भाषांतरपाठ २०.

११०.—१. धोबी कपडे धूत होता. २. गवळण लोणी विकीत होती. ३. गवळी दूध विकीत आहे. ४. पगडबंद पागोटें बांधीत होता. ५. त्याचे मळकट कपडे होते. ६. मी कापड विकत घेत होतों. ७. तिच्या पुष्कळ दासी आहेत. ८. ती राजकन्या आहे. ९. एक दासी उभी होती. १०. माळ्याची मुलगी फुलें तोडीत होती. ११. बोळ अरुंद असतात. १२. रस्ते रुंद असतात. १३. शेतकऱ्यांच्या बायका गवत कापीत होत्या. १४. शेतकरी शेतें नांगरीत होते. १५. कांहींजण बीं पेरीत होते. १६. मी आपले कपडे सुकवीत होतों. १७. कांहीं कापडें स्वस्त असतात. १८. कांहीं महाग असतात. १९. ते स्नान करीत होते. २०. कोष्टी दूध पीत होता.

१. The boys *were running*. २. The master *was reading* a book. ३. You *were talking*. ४. The bird *was flying*. ५. He *was selling* honey. ६. The children *were playing*.' ७. He *was smelling* the flower. ८. I *am tasting* this fruit. ९. The woman *was buying* soap. १०. The barber *was shaving* my chin and cheeks.* ११. My brother's hair is black. १२. Some women *were spinning* cotton. १३. The girls *were carding* wool. १४. A weaver makes cloth. १५. The carpenter *was making* some boxes. १६. Some men *were sawing* timber. १७. He *was sowing* good seed. १८. A tailor makes men's clothes.

---

* दाढी करीत होता.

धडा २१.

भविष्य काळ.

१११. क्रियापदाच्या पूर्वी shall व will हीं सहाय-क्रियापदें असलीं म्हणजे **भविष्य काळाचीं** रूपें सिद्ध होतात. जसें :—

To write ह्याचा भविष्य काळ.

एकवचन.	**अनेकवचन.**
१. I shall write.	We shall write.
२. Thou wilt write.	You will write.
३. He, she, it will write.	They will write.

११२. प्रथमपुरुषी कर्त्याला क्रियेविषयीं **वचन** द्याव-याचें किंवा **निश्चय** दाखवावयाचा असला तर I *will* write. We *will* write, असे प्रयोग करावे.

११३. शब्दसंग्रह २१.

मोडणें, फोडणें, to break.
होणें, शोभणें, } to become′. (अ०) (स०)
वेडावणें, to mock. (स० व अ०)
रडणें, to weep. (अ०)
खर्चणें, to spend. (स०)
रोटीवाला, a ba′ker.
शिपाई, } a sol′dier.* (साल्जर).

दुःखी, दरिद्री, { unhap′py.† mis′erable.
नगरवासी, a citi′zen.
रहिवासी, an inha′bitant.
भांडें, जहाज, a ves′sel.
आनंदी, खूष, glad.
आज्ञाधारक, obe′dient.

---

* लष्करी शिपाई = a soldier, शहराच्या बंदोबस्ताचा शिपाई = a police′man, कचेरींतील शिपाई, पट्टेवाला = a peon.

† साधारण रीतीच्या **वाईट वाटण्याला** sorry हा शब्द लावतात. I am sorry = **मला वाईट वाटतें.**

कुंभार,	a pot'ter.	आज्ञा मोडणारा,	disobe'dient.
रंगारी,	a dyer (डायर).	देश,	a coun'try.
आचारी,	a cook.	नगराबाहेरचा प्रदेश, खेडेंपाडें,	the coun'try.
कणीस,	an ear of corn.	देशबांधव,	coun'tryman.
बटाटा,	a pota'to.	मातीचा-ची-चें,	earth'en (th=द्).
भाजीपाला, शाकभाजी,	veg'etables	शिजवून तयार केलेला-ली-लें,	cooked.
वीट,	a brick.		
सुखी,	hap'py.		

भाषांतरपाठ २१.

११४.—१. Your country has many brave soldiers. २. These men are my countrymen. ३. You *will spend* that money. ४. He *will become* careless. ५. They were cutting timber. ६. You *will burn* your fingers. ७. The potter makes earthen vessels. ८. He *will bake* the bricks. ९. The baker *will bake* bread. १०. The cook was cooking the food. ११. He *will roast* some eggs. १२. I *shall roast* some ears of corn. १३. The woman *will boil* the potatoes. १४. The oil is hot—you *will scald* your hand. १५. She was *boiling* milk. १६. I *will speak* the truth. १७. You *will be* happy. १८. The boy is inattentive and lazy. १९. I *will come.* २०. I *shall come.* २१. We *will do* so. २२. They are my true friends. २३. The rich man has many good horses. २४. He was drinking coffee. २५. He has a disobedient son. २६. He *will be* busy. २७. You *will break* the looking-glass. २८. Corn *will become* dear. २९. Hindus eat cooked vegetables. ३०. The plants *will grow.*

१. रंगारी तुझें पागोटें रंगवील. २. तूं निरोगी होशील. ३. शेतकरी बीं पेरील. ४. आपले केस पांढरे* होतील. ५. तो दुःखी होईल. ६. तूं खुर्ची मोडशील. ७. ते वाघाला ठार मारतील. ८. तें जहाज बुडेल. ९. ते आपल्या जहाजाला बुडवितील. १०. त्याचें छानदार पागोटें आहे. ११. दिवा जळत आहे. १२. आमचा स्वैंपाकी भाकऱ्या† भाजील. १३. पाणी उकळत आहे. १४. बटाटे शिजत आहेत. १५. तो घाणेरडा मुलगा आपलीं बोटें चाटीत होता. १६. ते भांडतील. १७. मी आपला आज्ञाधारक सेवक आहें. १८. मी तेल कढवीत आहें. १९. खेड्यापाड्यांत राहणारे सुखी असतात. २०. शहरचीं मुलें त्याला वेडावतील. २१. मी तयार असेन. २२. त्याच ह्या मुली. २३. तो गरीब मनुष्य रडत होता. २४. आम्ही आमच्या मित्रांना बोलवूं. २५. ती स्वैंपाक करीत होती.

---

* Grey.

† Bread हें पदार्थाचें नांव आहे म्हणून ह्याचें अनेकवचन होत नाहीं. पृ० ४३. कलम ६८ पहा.

प्रश्न.

वाचनविचार.

१. इंग्रजींत स्वर किती आहेत व ते कोणते ? (२.)
२. *W* व *y* ह्यांस स्वरांत केव्हां व व्यंजनांत केव्हां गणावें ? (६.)
३. व्यंजनें किती आहेत ? (७.) व्यंजनांपैकीं कोणते वर्ण निरुपयोगी आहेत व कां ? (८.) *X* हा वर्ण मूळाक्षरांत कां गणूं नये ? (८.) कोणते इंग्रजी उच्चार मराठींत नाहींत ? (८.)
५. Not व all ह्या शब्दांतल्या स्वरांच्या उच्चारांत कोणता भेद आहे ? (८.‡)
६. कोणते उच्चार इंग्रजींत केवळ नवीन नसून मराठीपासून कांहींसे निराळे आहेत ? (९.)
७. स्वरोच्चार म्हणजे काय व ते किती प्रकारचे आहेत ? (१०.)
८. मुख्य स्वरोच्चार किती आहेत ? (११.)
९. हॉवर्ड साहेबांच्या क्रमाप्रमाणें मुख्य स्वरोच्चार उदाहरणांसहित सांगा. (१२.)
१०. शब्दांच्या शेवटच्या *e* चा उच्चार बहुतकरून कसा होतो ? (१६.†)
११. वाचनपाठ नंबर ७ मध्यें दिलेल्या शब्दांमध्यें स्वराच्या पुढें *r* असला तर, स्वरोच्चारांत कोणता फेर पडतो ? (२६.)
१२. संयुक्त स्वरोच्चार किती व कोणते ? (३७ व ३८.)
१३. वास्तविक पाहिलें तर इंग्रजींत खरे संयुक्त स्वरोच्चार किती आहेत ? (३९.)
१४. दुसरा संयुक्त स्वरोच्चार कोणत्या स्वरांच्या योगानें होतो तें सांगा. (४३.)
१५. One ह्या शब्दाचा उच्चार कसा होतो ? (भा० १०३.)
१६. *C* चा उच्चार क् असा केव्हां व स् असा केव्हां होतो हें उदाहरणासहित सांगा. (५६.)
१७. G चे उच्चार कोणते व ते केव्हां होतात ? (५८.)
१८. R च्या उच्चाराविषयीं काय नियम आहे ? (६१.)
१९. Accent म्हणजे काय ? (६९.)
